September 2010 | Priority | TUE AUG 31 2010 | Wk 35, 243-122

२४ मार्च २०१६

॥ श्री ॥

– माण्डूक्योपनिषद –

– शान्तिमंत्र –

ॐ भद्रं कर्णेभिः शृणुयाम देवाः
भद्रं पश्येमाक्षभिर्यजत्राः
स्थिरैरङ्गैस्तुष्टुवांसस्तनूभिः
व्यशेम देवहितं यदायुः ॥
स्वस्ति न इन्द्रो वृद्धश्रवाः
स्वस्ति नः पूषा विश्ववेदाः ।
स्वस्ति नस्तार्क्ष्यो अरिष्टनेमिः
स्वस्ति नो बृहस्पतिर्दधातु ॥
ॐ शान्तिः शान्तिः शान्तिः ॥

अथर्ववेदाच्या ब्राह्मणभागात आलेले हे उपनिषद । यात केवळ १२ मंत्र आहेत. परंतु अतिशय महत्वाचे हे उपनिषद आहे. कारण यात ॐकारोपासनेची साद्यंत चर्चा केली आहे.

या उपनिषदाबद्दल श्रीमत् शंकराचार्य म्हणतात –
माण्डूक्यम् एकमेव अलं मुमुक्षूणां विमुक्तये ।
तथापि असिद्धं चेत् ज्ञानं दशोपनिषदं पठ ॥

मोक्षाची इच्छा करणाऱ्यांना केवळ एकाच माण्डूक्य उपनिषदाचे अध्ययन पुरेसे आहे. मात्र तेवढी बुद्धीची तयारी नसेल तर प्रमुख दशोपनिषदे अभ्यासावीत. माण्डूक्य हे सहावे उपनिषद आहे. या जगातील सर्व वस्तूंच्या मुळाशी ॐकार असून त्यामध्ये भूत, भविष्य, वर्तमान व कालातीत असणाऱ्या सर्व गोष्टींचा समावेश होतो. हे सर्व ब्रह्ममय आहे. 'अयमात्मा ब्रह्म' - हे महावाक्य याच उपनिषदातील आहे. ॐ हाच या उपनिषदाचा प्रमुख विषय आहे. या उपनिषदाप्रमाणेच इतर उपनिषदामध्ये व गीतेमध्ये याची महती वर्णन केली आहे.

Birthday / Anniversary

© www.madhaveeraghuveer.com

ॐ हे परब्रह्म व अपरब्रह्माचे वाचक आहे.

परब्रह्म — सदा वर्तमान, केवल, शुद्ध असते. ते ज्ञानस्वरूप व आनंदस्वरूप असते. निवांत असते. निर्गुण, निराकार, ऊर्जास्वरूप असते. एकाकी न रमते। अशी त्याची अवस्था झाली तेव्हा एकोऽहं बहुस्याम्। असा मूळ संकल्पाचे स्फुरण झाले.

विचार आले, इच्छा झाली की थोडे एक पायरी खाली आले. म्हणून ते अपरब्रह्म। यात क्रियाशक्ती आहे मात्र परब्रह्म निवांत आहे निष्क्रिय आहे. आणि म्हणूनच ते यांच्यापेक्षा (अपर) श्रेष्ठ आहे.

ॐ ने या दोन्हीच्या पर-अपर ब्रह्माचा निर्देश होतो. ॐ हा ध्वनी आहे. आपण त्या चिन्हाने प्रगट करतो, म्हणजे त्याला आकार आहे. परब्रह्माच्या मनात विचारतरंग उठले त्यांचा हा ध्वनी आहे. आणि वस्तुतः ध्वनीपासून दृश्य जगाची निर्मिती झाली.

ध्वनीमध्ये आकार निर्माण करण्याची शक्ती आहे. बारीक धूळ पसरलेली पाटी असेल. त्याच्या समोर जर का ॐ काराचे उच्चारण केले तर त्यावर ॐकाराची आकृती उमटते. आधुनिक संशोधनानुसार देवनागरीतील सर्व वर्णांच्या चिन्हाबद्दल असेच निरीक्षण आहे. या वर्णांचेच पुढे शब्द बनतात.

ॐ कारातूनच मातृकांची निर्मिती झाली.

वर्णांतून शब्दनिर्मिती होते. शब्दनिर्मितीतून आकार दिसतात. हे जग नामरूपात्मक आहे. म्हणजे आधी नाम मग रूप असा निर्मितीचा क्रम आहे.

सोनाराला नुसते अलंकार बनवायला सांगून भागत नाही. त्याचे नाव सांगावे लागते अंगठी, बांगड्या, नेकलेस, हार, वाकी! त्याप्रमाणे निर्मिती केली जाते.

© www.madhaveeraghuveer.com

जगाच्या व्यवहाराबाबतीत हाच नियम लागू आहे व्याहृति म्हणजे उच्चार - परमेश्वराने भू: म्हटले व भूमी तयार झाली. हाच विचार बायबलमध्ये दिलेला आहे. Let there be light & light was there. नुसता उच्चार करण्याचा अवकाश लगेच निर्मिती संकल्पात् सिद्धि: ।

परब्रह्माला क्षय नाही. ॐ कार हे परब्रह्माचे द्योतक असल्यामुळे त्याला नाव मिळाले - 'अक्षर'. तो तटस्थ आहे.

अशा या ॐकाराची सविस्तर माहिती या उपनिषदात आली आहे. त्याची उपासना व त्याचे फळ ही सर्व माहिती या उपनिषदामध्ये आहे.

ॐ च्या उच्चारणानेच या जगाची निर्मिती झाली आहे. कोणत्याही मंत्राचा उच्चार करताना प्रथम ॐकार ध्वनि करावा. कारण जेव्हा असा उच्चार केला जातो तेव्हा त्याच्यात तथास्तु - तसेच होवो हे गृहीत धरले जाते. म्हणून ओंकार हा नेहमी सुखद असतो.

यज्ञविधिमध्ये अध्वर्यू इ. एकमेकांची परवानगी घेतात तेव्हा प्रत्येक क्रियेच्या आधी ॐ म्हणतात. यज्ञविधिमधील ब्रह्मा हा ऋत्विज तर ॐ खेरीज काहीच बोलत नाही.

असा हा शुभ, मंगल व आनंददायी ॐकार आहे.

ॐ कार हा त्रिकालातीत आहे.

पंचमहाभूतांच्या शक्तीमध्ये कालत्रयी फरक पडत नाही. त्यात वाढ नाही किंवा घट ही होत नाही. त्या सर्व शक्ती अक्षर आहेत. आणि या सर्व शक्तींचे एकमात्र तत्त्वरूप ओंकारमध्ये सामावले आहे.

अक्षरातून अक्षर शक्ती निर्माण झाल्या आहेत. ज्याप्रमाणे एका सूर्यबिंबातून अनेक किरणे निर्माण होतात तसेच या मूळ अक्षर ~~[illegible]~~ ॐकारातून शक्तींची निर्मिती झाली आहे.



© www.madhaveeraghuveer.com

ॐकाराच्या साडेतीन मात्रा---

© www.madhaveeraghuveer.com

ॐ इत्येतक्षरमिदं सर्वं तस्य उपव्याख्यानं
भूतं भवद् भविष्यदिति सर्वमोंकारमेव।
यच्चान्यत त्रिकालातीतं तदप्योंकार एव॥१॥

ॐ हे असे अक्षर आहे. हे सर्व दृश्य जगत ॐ आहे. त्याचे मी आता जवळून वर्णन करणार आहे. या विश्वातील भूत, वर्तमान व भविष्य हे सर्व ओंकारच आहे. आणि या त्रिकालाच्या पलीकडेही ॐ कारच आहे.

सर्वत्र घनदाट भरून राहिलेले ते आहे. त्याला कोणते योग्य नाव द्यावे हे न समजल्याने त्याला सद्वस्तु म्हणतात. त्या वस्तूत सर्व शक्ती ठासून भरल्या आहेत.

त्या निवांत, शांत परब्रह्माला स्फुरण झाले तेव्हा त्यांनेच, वेगवेगळी रूपे घेऊन एक खेळ मांडला. स्फुरणातून उठलेल्या ओंकार नादाने त्याची क्रियाशक्ती जागृत झाली. तीच मूळमाया!

त्या निवांत दिव्यशक्तीला काही नावच नव्हते. ऋषींनी त्या शक्तीचा उल्लेख ॐ म्हणून केला. व ते त्या अक्षराचा सतत उच्चार करू लागले. त्या परब्रह्माला ते आपलेच नाव असावे असे वाटले व ते त्या सादाला प्रतिसाद देऊ लागले. ॐकाराला ओ देऊ लागले.

कठोपनिषदात यमराज नचिकेताला सांगतात परब्रह्माबद्दल अगदी थोडक्यात काही सांगायचे असेल तर त्याला ॐ म्हणावे लागेल.

तैत्तिरीय उपनिषदातही म्हटले आहे.

ॐ इति ब्रह्म। ओमितीदं सर्वम्। ओम् इति एतद् अनुकृति ईस्य वा अप्यो श्रावय इति आश्रावयान्ती।



© www.madhaveeraghuveer.com

| M | T | W | T | F | S | S |
|---|---|---|---|---|---|---|
| | | 1 | 2 | 3 | 4 | 5 |
| 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 | 12 |
| 13 | 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 |
| 20 | 21 | 22 | 23 | 24 | 25 | 26 |
| 27 | 28 | 29 | 30 | | | |

ॐ ही अनुकृति म्हणजे अनुमोदन सूचक शब्द आहे. शिष्य जेव्हा गुरुंकडे उपदेश देण्यासाठी प्रार्थना करतो तेव्हा गुरु ॐ अक्षराने प्रारंभ करतात.

कोणतेही कार्य सुरु करताना वा शेवट करताना ॐ किंवा ॐ तत् सत् असे म्हणावा असा गीतेचा स्पष्ट आदेश आहे. त्यामुळे प्रत्येक कर्म परमेश्वराला अर्पण केले जाते. व साधक कर्मबंधनात सापडत नाही.

ॐकार साधनेने ब्रह्मप्राप्ति होतेच परंतु ऐहिक प्रश्नांवरही ते उपयोगी ठरते. सध्या तर ओंकार थेरपी सुद्धा प्रचलित आहे.

अक्षर याचे दोन अर्थ आहेत — १. वर्ण (मातृका) २. अविनाशी ब्रह्म

अक्षराचा- वर्णाचा आकार व ध्वनी नष्ट होऊ शकतो परंतु त्याद्वारे मिळालेले ज्ञान चिरंतन राहू शकते. त्यामुळे दोन्ही अर्थाने ॐ चा बोध होतो. ते अविनाशी परब्रह्म ही आहे व ध्वनिसूचक आकार सुद्धा आहे. शब्दात विलक्षण असे सामर्थ्य आहे. मात्र त्यासाठी शब्दांची विशिष्ट कंपने निर्माण व्हावी लागतात. त्यातून त्या शब्दात शक्ती निर्माण होते. म्हणूनच मंत्र सिद्ध करून त्याचे उच्चारण करावे. असे केल्यामुळे त्या मंत्रातून इष्ट प्राप्त होऊ शकते.

ॐकार त्रिकालाच्या पलीकडे आहे. हिरण्यगर्भाच्या पलीकडे, ब्रह्मांडाच्या बाहेर जे आहे ते ॐ चेच रूप आहे.

ॐ हे अक्षर परब्रह्माचे रूप आहे. तो सगुण व निर्गुणाच्या संधी आहे. निर्गुण निराकाराला सगुण साकारामध्ये आणणारा, विश्वारंभाचा पहिला ध्वनी - ॐ

जसे बीजात सर्व वृक्ष सामावलेला असतो तसेच ॐ हे प्रचंड विस्ताराच्या विश्वाचे बीज आहे.

Birthday / Anniversary

© www.madhaveeraghuveer.com

सर्वं ह्येतद् ब्रह्म अयमात्मा ब्रह्म सोऽयमात्मा चतुष्पात् ॥ ॥२॥

हे जे सर्व विश्व दिसते आहे, ते ब्रह्मच आहे. हा आत्मा म्हणजे ब्रह्मच आहे. तो चतुष्पाद आहे.

पद्यते इति पादः - अपेक्षित वस्तूकडे पोहोचवतो तो पाद म्हणजे त्याच्या चार स्थिती.

अयमात्मा ब्रह्म - हे वाक्य ओंकाराची ओळख करून देण्याकरता वापरले आहे.

ईशावास्य उपनिषदामध्ये 'अपावृणु' म्हणून जे दूर करायला सांगितले आहे. सत्य काय ते नेमके मला दिसू दे अशी प्रार्थना केली आहे.

इथे ते नेमके काय आहे, हे स्पष्टपणे दाखवले आहे. आणि म्हटले आहे — अयमात्मा ब्रह्म

आम्ही सनातन अशा या अक्षर सत्यापासून निर्माण झालो आहोत. ती अक्षर व अनंत शक्ती आमच्यामध्ये आहे. ही शक्ती म्हणजे काय? तर शरीरात वसत असूनसुद्धा शरीर नाही असा आत्मा आहे. तोच ब्रह्म आणि ते ब्रह्म म्हणजेच ॐ आहे.

चार पावल्यांचा जसा रुपया बनतो तशी या ओंकाराची चार पदे आहेत. म्हणून त्याला चतुष्पाद म्हटले आहे. — अ, उ, म, बिंदू

किंवा पद या शब्दाचा दुसरा अर्थ आयुष्यातील टप्पा — मॅनेजरपद, मातृपद. या अर्थाने विचार केला असता स्थानाची मर्यादा नसलेली ती एक आयुष्यातील अवस्था आहे. मात्र यापैकी कोणतीही अवस्था पूर्ण नसते तिला मिळालेले मातृपद हे सत्य असले तरी मातृपद ही तिची खरी ओळख नाही. म्हणजेच मी स्त्री आई झाली हे जरी सत्य असले तरी पूर्ण सत्य नाही. त्याचप्रमाणे ओंकारातील प्रत्येक पद खरे असले तरी



©www.madhaveeraghuveer.com

तो पूर्ण ओंकार नाही.
त्याला जाणून घ्यायचे असेल तर अगदी जवळच्या गोष्टीपासून सुरुवात करावी.
हात पाय नाक डोळे म्हणजे मी नाही.
मन बुद्धि म्हणजे मी नाही.
तर या सर्वांकडून काम करवून घेणारा जो मी आहे तोच या सर्वांना शक्ती पुरवतो
त्याला मी नाव दिले आहे —— आत्मा! चैतन्य!
हा आत्मा म्हणजेच परमात्मा, ब्रह्म.
पण तो दूरचा वाटतो. त्यामानाने माझा आत्मा मला जवळचा वाटतो. त्याला जाणणे म्हणजे ब्रह्म जाणल्यासारखेच आहे. आणि त्याला जाणणे हाच जीवनाचा उद्देश आहे.

जागरितस्थानो बहिष्प्रज्ञ: सप्ताङ्ग एकोनविंशतिमुख:
स्थूलभुग्वैश्वानर: प्रथम: पाद: ॥ ३ ॥

आपल्या चार अवस्था आहेत — जागृती, स्वप्न, सुषुप्ति, तुरिया.
स्थूलाचा भोग घेणारा वैश्वानर हा प्रथम पाद आहे जागेपणा हे त्याचे कार्यक्षेत्र असून तो बाहेरच्या वस्तू — जड वस्तु — जाणतो व त्याचा भोग घेतो. त्याला सात अवयव व एकोणिस तोंडे आहेत.
सामान्य माणसाचे बहुतेक सर्व व्यवहार जागेपणीच चालत असल्याने या जागृतावस्थेला तो ज्ञानाची अवस्था समजतो. या अवस्थेत तो अनेक जड वस्तूंचा भोग घेतो.
सप्त अंगे — सात अवयव, जसा हृदयातील आत्मा शरीर धारण करतो, तसा ईश्वर हे विश्व



© www.madhaveeraghuveer.com

8 am धारण करतो. अशी श्रुतींनी कल्पना केली आहे.
१. शिर – द्युलोक २. नेत्र – सूर्य ३ प्राण – वायु
9 ४. मध्यस्थान – आकाश ५. मूत्रस्थान – अन्न व पाणी
६. — दोन चरण – पृथ्वी ७. मुख – अग्नी
10 सामान्यांच्या अनुभवावरून अनंताची विशालता वर्णन
करण्याची ही मानवी मनाची धडपड आहे.
11 या स्थूल शरीराला १९ मुखे आहेत.
५ ज्ञानेंद्रिये + ५ कर्मेंद्रिये + ५ प्राण
12 + मन + बुद्धी + चित्त + अहंकार

1 pm हे जागृतीच्या जाणिवेचे पहिले दर्शन – एखाद्या
वाड्याला जसे देवडी, सोपा, ओटी, माजघर
2 असावे तसे हे सर्वात बाहेरचे स्थूल स्थान
आपल्या अगदी परिचयाचे आहे.

3

स्वप्नस्थानोऽन्तःप्रज्ञः सप्ताङ्ग एकोनविंशतिमुखः।
4 प्रविविक्तभुक् तैजसो द्वितीयः पादः ॥४॥

5 सूक्ष्म वस्तूंचा उपभोग घेणारा हा तैजस हा (आत्म्याचा)
दुसरा पाद आहे. हा आतील म्हणजे मनातील वस्तु
6 जाणणारा. त्याला पण सात अवयव व एकोणीस मुखे आहेत.
जागेपणी अनुभवलेल्या व भोगलेल्या वस्तूंचे
7 सूक्ष्म संस्कार मनावर उमटून त्यांचा साठा बनतो.
ते संस्कार जिवंत असतात. त्यांच्यामध्ये व्यक्त
होण्याची धडपड असते. जागृती लोपली की ते व्यक्त
रूप धारण करतात व आपल्याला स्वप्न पडते.
जागृतीप्रमाणेच स्वप्नात देखील ज्ञाता व ज्ञेय
हा भेद असतो. परंतु जागेपणातील ज्ञेय हे सर्वांसाठी
Birthday / Anniversary सारखेच असते. परंतु स्वप्नामधील ज्ञेय हे

आतूनच निर्माण होते व आपल्यापुरतेच असते. स्वप्न पडत असताना 'मला स्वप्न पडत आहे' याची जाणीव आपल्याला नसते

स्वप्न हे खाजगी असते. जागेपणी त्याच वस्तू सर्वजण पाहतात परंतु स्वप्नातील वस्तू ज्याच्या त्याच पाहू शकतो. एकाच्या स्वप्नातील वस्तू दुसरा पाहू शकत नाही. जागेपणी वस्तूंवर आपला बऱ्यापैकी ताबा असतो. त्यात बदल घडवून आणणे शक्य असते. परंतु स्वप्नावस्थेत स्वप्नावर आपला ताबा चालत नाही.

ज्या शक्तीने ही स्वप्नसृष्टी निर्माण केली त्या शक्तीला तैजस हे नाव दिले आहे. प्रत्यक्ष विश्व हे त्या तेजस्वी हिरण्यगर्भापासून निर्माण झाले आहे. तशीच सूक्ष्म, काल्पनिक सृष्टी निर्माण करणारा हा तैजस आपल्यात तेजाने स्वप्नसृष्टी निर्माण करतो.

जागे झाल्यावरही अनेकदा स्वप्न आठवते. त्यातील अनुभव खरे वाटतात. कारण ते प्रविविक्त (सूक्ष्म भोग आहेत. त्यात वैचारिक सलगपणा असेलच असे नाही.

विविक्त म्हणजे – तुकडे, सुटे सुटे, वेगवेगळे. आणि प्रविविक्त म्हणजे प्रकर्षाने निरनिराळा! म्हणजे एका प्रसंगाचा दुसऱ्या प्रसंगाशी संबंध असेलच असे नाही.

ही सर्व सृष्टी आपल्या अंतर्मनात निर्माण झाली आहे तिला स्थूल रूप नसते. म्हणूनच हा तैजस अंतःप्रज्ञ असतो. याचा प्रकाश आत पसरतो. हे सर्व भोग अंतर्मुख होऊनच घ्यावे लागतात. त्यावेळी आमची इंद्रिये झोपलेली असली तरी सूक्ष्म रूपाने मनात असतात.

त्यामुळे पाहण्या ऐकण्याचा, पळण्याचा, वासण्याचा अनुभव



आम्ही घेतो पण सूक्ष्मपणे, आतल्या आत!

यत्र सुप्तो न कंचन कामं कामयते
न कंचन स्वप्नं पश्यति तत्सुषुप्तम्।
सुषुप्तस्थान एकीभूतः प्रज्ञानघन एव
आनन्दमयो ह्यानन्दभुक् चेतोमुखः प्राज्ञस्तृतीय
पादः॥५॥

सुषुप्ति म्हणजे गाढ निद्रा। हे ज्याचे कार्यक्षेत्र आहे तो प्राज्ञ हा तिसरा पाद होय. ज्या अवस्थेत निजलेला पुरुष कशाची इच्छा करत नाही व स्वप्न पाहत नाही तिला सुषुप्ति असे म्हणतात. प्राज्ञ हा एकरूप, ज्ञानमय (जाणिवमय), आनंदमय व आनंदाचा उपभोग घेणारा आणि चेतोमुख म्हणजे मनच ज्याचे तोंड आहे असा असतो.

(१) सुषुप्तीमध्ये वासना नसते. कारण वासना करणारा मी तात्पुरता अंतर्धान पावलेला असतो.

मनुष्य गाढ झोपी गेला असताना त्याचा वासनात्मक म्हणजेच सूक्ष्म देह काही काळ स्वस्थ बनतो. त्या जीवाची खरी वासना कोणती हे त्या वेळी पाहता येते. मात्र त्यासाठी पाहणाऱ्याला सूक्ष्म दृष्टी हवी. संतांना अशी दृष्टी असते. म्हणून ते आपल्या शिष्याची वासना नक्की कशात अडकली आहे हे ओळखू शकतात.

(२) एकीभूत - जागेपणाचे जड जगत व स्वप्नकालचे सूक्ष्म जगत ही दोन्ही सुषुप्तिमध्ये लीन होतात.

(३) प्रज्ञानघन - केवळ जाणीवरूप! जागेपणी वा स्वप्नात अनुभवाला येणाऱ्या सर्व वस्तु अज्ञानरूपी अविद्यारूपी जाणीवेमध्ये विलीन होतात. म्हणून प्रज्ञानघन.

(४) आनंदमय व आनंदभुक् - समाधानाचा व आनंदाचा अनुभव देणारी ही स्थिती आहे. गाढ निद्रेमध्ये ~~जी~~ जीव हा मीपणाने लय पावतो तिथे द्वैत उरत नाही. जीव शांत होतो. (५) चेतोमुख - मनच ज्याचे तोंड आहे असा।

11 SAT SEP 2010

Wk 36, 254-111

*Priority*

September 2010

| M | T | W | T | F | S | S |
|---|---|---|---|---|---|---|
| | | 1 | 2 | 3 | 4 | 5 |
| 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 | 12 |
| 13 | 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 |
| 20 | 21 | 22 | 23 | 24 | 25 | 26 |
| 27 | 28 | 29 | 30 | | | |

8 am स्वप्न आणि जागृती या दोन्ही तर मनाच्याच अवस्था
आहेत. सुषुप्तिमधून प्रगट होताना त्या मनाच्या द्वारा
9 प्रगट होतात. म्हणून त्याला चेतोमुख म्हटले आहे.
सुषुप्ति ही आत्म्याच्या अगदी जवळची अवस्था आहे,
10 म्हणून गाढ निद्रेला ब्रह्मानंदसहोदर असे म्हटले आहे.
परंतु तरीही ही आत्म्याची शुद्धावस्था होऊ शकत
11 नाही कारण जीव त्यामध्ये अज्ञानाच्या अंधकारात जातो,
व तो पुन्हा जागृती व स्वप्न या वासनायुक्त
12 अवस्थांमध्ये येतो.
या निद्रेच्या आनंदासाठी ज्ञानेंद्रिये, कर्मेंद्रिये मन
1 pm बुद्धी या कशाचीही गरज नसते. हा आनंद साधनेशिवाय
मिळणारा निरुपाधिक, स्वयंभू, स्वाभाविक असा आहे.
2 म्हणून याला आनंदभुक म्हटलेले आहे.
इथे जाणीव आहे पण गोठलेली आहे ∴ प्रज्ञानघन!

3

4

5

6

7

Birthday / Anniversary

© www.madhaveeradhuveer.com

8 am एष सर्वेश्वर एष सर्वज्ञ एषोऽन्तर्याम्येष योनिः
सर्वस्य प्रभवाप्ययौ हि भूतानाम् ॥६॥

9 (प्राज्ञ, तैजस आणि वैश्वानर या तीन रूपांनी कार्य
10 करणारा) हा आत्मा सर्वांचा ईश्वर, सर्वज्ञ, सर्वांचा
अंतर्यामी आणि समस्त जीवांच्या उत्पत्तीचे व लयाचे
11 स्थान असल्याने सर्वांचे आदिकारण आहे.
'अयम् आत्मा ब्रह्म' म्हणजेच आत्मस्वरूप हेच
12 परमात्मस्वरूप असल्याने परमात्म्याचे जे जे गुण
आहेत ते सर्व आत्म्याच्या ठिकाणी अनुभवास येतात.
1 pm सत्तारूपाने सर्वांचे नियमन करणारा म्हणून तो ईश्वर,
शुद्ध जाणिवेने आतबाहेर भरलेला म्हणून सर्वज्ञ आहे.
2 सर्वांना व्यापून राहिला आहे म्हणून सर्वांतर्यामी आहे.
आणि आनंदरूप म्हणून सर्वांचे आदिकारण आहे.
3 वैश्वानर, तैजस, प्राज्ञ ही सर्व नावे त्या त्या
ठिकाणच्या कार्यावरून दिली आहेत. परंतु मूलतः तो
4 एकच आहे. वायु एकच परंतु कार्यावरून त्याला प्राण,
अपान इ० नावे दिली जातात, तसाच एकच परमात्मा
5 या तीन स्थितीत जाणवतो.
मागील मंत्रानही 'प्राज्ञ'चे वर्णन आले आहे. परंतु
6 ते पूर्ण न झाल्याने पुन्हा या मंत्रात स्पष्ट केले आहे.
आत्मज्ञान होण्यासाठी अहंभाव विसरावा लागतो. इथे
7 सुषुप्तिमध्ये 'मी' विरघळून जातो. तो ज्या शक्तीला जोपत
भेटतो ती शक्ती कशी आहे?
ईश्वर - ईशते इति ईशः (नियंत्रण, शासन करणारा
सर्वज्ञ
सर्वांतर्यामी - प्रत्येकामध्ये हा आहेच.
आदिकारण - भूतमात्रांची उत्पत्ति व लय याच्यातून आहे.



© www.madhavaveeraghuveer.com

जिथून सुरुवात आहे तिथेच समाप्ति आहे. हे वर्तुळ आहे. बीजातून वृक्ष व वृक्षातून बीज निर्माण होते.

प्रथम आकाश निर्माण झाले. त्यातून वायू त्यातून तेज त्यातून पाणी आणि त्यातूनच पृथ्वीची निर्मिती झाली. लय होताना मात्र उलट क्रमाने होतो. प्रथम पृथ्वी पाण्यात विरघळते--- पाणी तेजाने सुकून जाते--- तेज वायूत विलीन होते---- वायू आकाशात विलीन होतो---- पुढे आकाश हे महत् तत्त्वात विलीन होते. सर्व गोष्टींना हाच नियम लागू आहे.

बीजात एवढा मोठा वृक्ष सामावला आहे त्याची कल्पना बीजाकडे पाहून येत नाही. तसेच सृष्टीच्या मुळाशी अविद्या, कामना व कर्म असतात.

अन्तप्रज्ञ न बहिष्प्रज्ञं नोभयत: प्रज्ञं न प्रज्ञानघनं न प्रज्ञं नाप्रज्ञम्
अदृष्टमव्यवहार्यमग्राह्यमलक्षणमचिन्त्यमव्यपदेश्यमेकात्मप्रत्ययसारम्।।
प्रपञ्चोपशमं शान्तं शिवमद्वैतं चतुर्थं मन्यते स आत्मा स विज्ञेय:।।

तुरीय हा आत्म्याचा चतुर्थ पाद आहे. ज्ञानी लोक तुरीय आत्म्यालाच पुढीलप्रमाणे मानतात. शांत, शिव व अद्वैत आत्मा अंत:प्रज्ञ नाही, बहिष्प्रज्ञ नाही किंवा उभय म्हणजे अंतर किंवा बाहेर असा दोन्ही प्रज्ञ नाही. तो प्रज्ञही नाही आणि अप्रज्ञही नाही शिवाय प्रज्ञानघन ही नाही.

तो अदृष्ट, अव्यवहार्य, अग्राह्य, अलक्षण, अचिंत्य, अव्यपदेश्य, एकात्मप्रत्ययसार आणि प्रपंचाचा उपशम असा आहे. जाणण्याला खरा योग्य तोच आहे.

व्यवहारात आपण आत्मा जाणता आहे असे म्हणतो परंतु आत्मा जाणता नाही, वा नेणता ही नाही. त्याच्या ठिकाणी ज्ञाता-ज्ञेय हा भेदही नाही. तो आंतील सूक्ष्म वस्तूंचा किंवा बाहेरील जड वस्तूंचा ज्ञाता नाही.

Birthday / Anniversary

8 am सोऽयमात्माध्यक्षरमोङ्कारोऽधिमात्रं पादा मात्रा मात्राश्च
पादा अकार उकारो मकार इति ॥ ८ ॥

9
सः अयम् आत्मा अध्यक्षरम् ओंकारः अधिमात्रं पादाः
10 मात्राः च पादाः – अकारः उकारः मकारः इति।

वर ज्या आत्म्याचे वर्णन केले आहे तो आत्मा
11 ओंकाराने व्यक्त केला जातो. म्हणजे नामी व नाम
12 ॐकार आहे. अध्यक्षरम् म्हणजे या अक्षराने तो व्यक्त
केला जातो.

अक्षर किंवा वर्ण मात्रेने मोजला येतो.
1 pm व्यंजनाला अर्धी मात्रा, स्वराला एक मात्रा, दीर्घ स्वराला
2 दोन मात्रा, प्लुत स्वराला तीन मात्रा असतात.

ॐ कार हे दिसायला एकच अक्षर असले तरी
3 त्याच्या साडेतीन मात्रा होतात. अ उ म च्या प्रत्येकी
१-१ मात्रा व पुढची अर्धी मात्रा अनुच्चार्य आहे.
4 तो आतमध्ये घुमणारा नाद आहे.

घंटा वाजवली की नाद होतोच परंतु थांबली तरी
5 नंतर काही काळ तो गुंजत राहतोच

'यथा पिण्डे तथा ब्रह्माण्डे' हा नियम लागू करून
6 उपनिषदे असे सांगतात की पिंडामध्ये जशी जागृती
स्वप्न सुषुप्ति व तुरीया अशा जाणिवेच्या चार तऱ्हा
7 अनुभवास येतात त्याप्रमाणे ब्रह्मांडामध्ये विराट
हिरण्यगर्भ, ईश्वर आणि परब्रह्म असे ब्रह्माचे चार
स्तर आढळतात. विराट हे व्यक्त रूप तर
हिरण्यगर्भ हे अव्यक्त रूप आहे

ईश्वर म्हणजे परब्रह्माचे सगुण रूप आहे. ह्याचा
स्वर ओंकार असून याला शब्दब्रह्म असेही म्हणतात.



© www.madhuveeraghuveer.com

October 2010

| M | T | W | T | F | S | S |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | 1 | 2 | 3 |
| 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 |
| 11 | 12 | 13 | 14 | 15 | 16 | 17 |
| 18 | 19 | 20 | 21 | 22 | 23 | 24 |
| 25 | 26 | 27 | 28 | 29 | 30 | 31 |

*Priority*

THU SEP 2010 16



8 am
अकार - विराट
उकार - हिरण्यगर्भ
9
मकार - मूळमाया
अर्धमात्रा - शुद्ध स्वरूप

10

11

12

1 pm

2

3

4
जागरितस्थानो वैश्वानरोऽकारः प्रथमा मात्रा
आप्तेरादिमत्वाद्वा आप्नोति ह वै सर्वान्
5
कामानादिश्च भवति य एवं वेद ॥

6
ओंकाराची पहिली मात्रा 'अ' आहे. सर्वत्र व्याप्त असल्याने व सर्वांचा आदि असल्याने याचे स्थान जागृति व नाव वैश्वानर आहे. ओंकाराची उपासना अ वर लक्ष केंद्रित
7
करून केली तर त्याच्या सर्व कामना पूर्ण होतात व तो श्रेष्ठ बनतो. त्याला ऐहिक समृद्धी लाभते.

प्रश्नोपनिषदात (५.२) ओंकार व ब्रह्माचे ऐक्य वर्णन केले आहे व जशी ओंकारोपासना करतात तसे फळ मिळते असे सांगितले आहे.

Birthday / Anniversary

© www.madhaveeraghuveer.com

8 am अकार ऋग्वेदाची ऋचा आहे. पृथ्वीलोकाशी संबंधित तिची उपासना पुन्हा मनुष्यजन्म देते व तिथे तो तप, ब्रह्मचर्य व श्रद्धेने उपासना करून महिमा मिळवतो, ऐश्वर्य संपन्न होतो व आध्यात्मिक 10 प्राप्ति करून घेतो.

अकाराची उपासना म्हणजेच विज्ञानाची उपासना 11 (सायन्स) त्या माध्यमातून आपण एकच वासना पूर्ण करण्याचे अनेक मार्ग शोधून काढतो. जे राष्ट्र 12 विज्ञानसंपन्न (अस्त्रसंपन्न) असते त्याला जगात प्रथम स्थान असते.

1 pm

2

3

स्वप्नप्रस्थान: तैजस उकारो द्वितीया मात्रा
4 उत्कर्षाद् उभयत्वाद् वा उत्कर्षति ह वै ज्ञानसंततिं समानश्च भवति नास्याब्रह्मवित् कुले भवति य एवं वेद॥

5 स्वप्न हे ज्याचे कार्यक्षेत्र आहे तो तैजस म्हणजे 6 उकार ही दुसरी मात्रा आहे. कारण उत्कर्ष आणि मध्यवर्तीपणा हे गुण तैजस आणि उकार यामध्ये समान आहेत. जो या उकाराची या दृष्टीने उपासना करतो तो आपल्या ज्ञानाचे क्षेत्र वाढवतो आणि भेदाच्या पलीकडे जातो. त्याच्या कुळात ब्रह्माला न जाणणारा कुणी जन्मास येत नाही.

Birthday / Anniversary

© www.madhaveeraghuveer.com

October 2010

| M | T | W | T | F | S | S |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | 1 | 2 | 3 |
| 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 |
| 11 | 12 | 13 | 14 | 15 | 16 | 17 |
| 18 | 19 | 20 | 21 | 22 | 23 | 24 |
| 25 | 26 | 27 | 28 | 29 | 30 | 31 |

*Priority*

SAT 18 SEP 2010

Wk 37, 261-104

8 am ॐकाराची उपासना म्हणजे अदृश्याची सूक्ष्माची उपासना आहे. हिलाच मंत्रशास्त्र असे म्हणतात. उपनिषदांतील ऋषींचा असा स्पष्ट अनुभव आहे की ज्याप्रमाणे प्रत्येक माणसाच्या जड देहाला चालवणारा एक सूक्ष्म
10 देह असतो त्याचप्रमाणे या दृश्य विश्वाला वासना व्यापून आहे. ही वासना शक्तीरूप असून तिच्या
11 जोरावरच जडाच्या उलाढाली होत असतात.

ॐकाराची उपासना म्हणजे या शक्तीची उपासना।
12 ही शक्ती वश होऊ लागली की योग्याच्या अंगी सिद्धी प्रकट होऊ लागतात.

1 pm

2

3

4

5

6

7

Birthday / Anniversary

8 am सुषुप्तस्थानः प्राज्ञः मकारः तृतीया मात्रा मितेरपीतेर्वा
मिनोति ह वा इदं सर्वम् अपीतिश्च भवति य एवं वेद॥

9

10

ओंकाराची तिसरी मात्रा 'म' आहे. त्याप्रमाणे
11 आप्ति व आदि मधून अ कार आला. उत्कर्ष व
उभयत्व यातून उ कार आला त्याचप्रमाणे मित व
12 अपीत मधून म कार आला.

मित म्हणजे मोजणे आणि अपीत म्हणजे
1 pm विलीन झालेला किंवा करून घेणारा!

म म्हणताना आपले दोन्ही ओठ मिटतात म्हणजे
2 तो एकप्रकारे समाप्तिदर्शक आहे.

इथे साधक इतका मोठा होतो सर्व मोजू मापू शकतो,
3 सर्व काही जाणू शकतो. हा विश्वभर व्यापतो. महान
सामर्थ्यामुळे सर्व त्याच्यात विलीन होते.

4 परब्रह्माचा हा तिसरा पाद प्राज्ञ म्हणून ओळखला
जातो. वेदांमध्ये म कार सामवेदाचा आहे.

5

6

7

Birthday / Anniversary

© www.madhaveeraghuveer.com

8 am
अमात्रश्चतुर्थोऽव्यवहार्यः प्रपञ्चोपशमः शिवोऽद्वैतः
एवमोङ्कार आत्मैव, संविशति आत्मनाऽत्मानं
9
य एवं वेद य एवं वेद ॥१२॥

10
मात्रारहित ओंकार म्हणजे तुरीय आत्मा आहे. तो अव्यवहार्य, प्रपंचोपशम, शिव आणि अद्वैत असा आहे. याप्रमाणे ओंकार म्हणजे आत्मा समजावा. जो या प्रकारे ओंकाराची उपासना करतो तो स्वतः मध्येच आत्मस्वरूप बनून जातो.
12

हा चौथा पाद म्हणजे तुर्यावस्था आहे. ही अमात्रा आहे. म्हणजे यासाठी कोणताही ध्वनी किंवा उच्चारण नाही. केवळ गुंजन आहे.
1 pm

2
उच्चारण नसल्यामुळे अव्यवहार्य आहे. विस्ताराचा उपशम (समाप्ति) आहे. हा शिव, मंगलमय, अद्वैत आहे. इथे आत्मा आत्म्यात प्रवेश करतो.
3

ब्रह्मविद ब्रह्म एव भवति।

थेंबुटा सागरी बुडाला ----
4

तो अनंत सर्वव्याप्त, आनंदरूप होतो.

हे या चतुर्थ मात्रेच्या उपासनेचे फळ आहे.
5

6

7

Birthday / Anniversary

© www.madhaveerghuveer.com

Priority

September 2010

| M | T | W | T | F | S | S |
|---|---|---|---|---|---|---|
| | | 1 | 2 | 3 | 4 | 5 |
| 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 | 12 |
| 13 | 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 |
| 20 | 21 | 22 | 23 | 24 | 25 | 26 |
| 27 | 28 | 29 | 30 | | | |

५ ऑक्टोबर २०१२

॥ श्री ॥

## - माण्डूक्य कारिका -

8 am

नारायण, ब्रह्मदेव, वसिष्ठ, शक्ती, पराशर, व्यास शुक या गुरुपरंपरेतील गौडपादाचार्य आहेत. त्यांचे शिष्य गोविंदपादाचार्य व त्यांचे शिष्य आद्य शंकराचार्य! म्हणजेच शंकराचार्यांचे आजेगुरु गौडपादाचार्य!

अशा श्री गौडपादांनी बदरिकाश्रमात दीर्घकाल तपस्या केली. त्यावेळी प्रत्यक्ष श्री. नारायणांनी प्रसन्न होऊन त्यांना मांडूक्यावरील कारिका उपदेशिल्या असे आनंदगिरी याने लिहिले आहे.

कारिकेतील श्लोक म्हणजे मूळ उपनिषदावरील भाष्य नव्हे. श्रुतींचा मध्यवर्ती विषय-तुरीय-म्हणजेच परिपूर्ण अद्वैत सत्यतत्त्व वाचकांपर्यंत नेणे हा मुख्य उद्देश आहे.

कारिकाकारांनी आपल्या विवक्षित पूर्वपक्षाच्या विस्तारा करिता जी वचने तात्त्विकदृष्ट्या अगर प्रत्यक्षपणे उपयोगी पडण्यासारखी नाहीत त्यांना बगल दिली आहे. परंतु जे विचार उपनिषदात केवळ सूक्ष्म वचनांनी सूचित केले आहेत ते मात्र कारिकेत ठळकपणे मांडले आहेत.

या कारिकांची विभागणी चार भागात केली आहे.

१. आगम प्रकरण - २९ श्लोक
मांडूक्यातील १२ मंत्रांचे विवेचन

२. वैतथ्य प्रकरण - ३८ श्लोक
जीव ब्रह्माचे ऐक्य. सर्व सृष्टीचे मायामयत्व

३. अद्वैत प्रकरण - ४८ श्लोक
अद्वैताविषयी निरूपण

४. १०० श्लोक

एकूण २१५ कारिका आहेत.

Birthday / Anniversary

© www.madhaveeraghuveer.com

# आगम प्रकरण (२९)

बहिष्प्रज्ञो विभुर्विश्वो ह्यन्तःप्रज्ञस्तु तैजसः।
घनप्रज्ञस्तथा प्राज्ञ एक एव त्रिधा स्मृतः॥

मांडूक्यातील पहिल्या सहा मंत्रांचा सारांश यात आहे.
अतति इति आत्मा! व्यापून रहातो तो आत्मा!
आपल्यातील आत्मतत्त्व तीन अवस्थांमध्ये काम करते.
यत्स्वप्नजागरसुषुप्तमवैति नित्यम्।

जागृती → त्याच्या अभिमानाचे स्थान जागृती आहे. त्याची जाणीव बाहेर पसरलेली असते. तो विभु (व्यापक) आहे. त्यामुळे जगातील सर्व घटना जाणल्या जातात.

स्वप्न → या स्थितीत बाह्य जग पूर्णपणे बंद होते. व मन आपले जग निर्माण करते. या मनःकल्पित जगात तो सर्व गोष्टींचा अनुभव घेतो. सूक्ष्म इंद्रियांनी सर्व भोग घेतो. या स्थितीत ही प्रज्ञा केवळ असत्य जगाला पाहत असते.

सुषुप्ति → गाढ झोपेत ही बाहेर धावणारी प्रज्ञा घनीभूत होते. एकत्रित करून ठेवली जाते. आवरून, गुंडाळून ठेवली जाते. ∴ तिला घनप्रज्ञ म्हणतात. या प्रज्ञेला फाटे फुटलेले नसतात. ती शांत असते. थोडक्यात जाणीव गोठल्याप्रमाणे होते. ती लुप्त होत नाही. कारण जाग आल्यावर ती बाहेर धाव घेते. फक्त त्या क्षणी ती काहीही ग्रहण करत नाही. कार्यप्रवण होत नाही.

एखादे वासरे मूल दिवसभर दंगा करून रात्री शांत झोपते तेव्हा ते सुखात असते.

या तीनही स्थितीतील आत्मतत्त्वाला जागृतीमध्ये विश्व, स्वप्नामध्ये ~~प्राज्ञ~~ तैजस आणि सुषुप्तिमध्ये प्राज्ञ म्हटले जाते. मात्र आत्मतत्त्व एकच असते.

एकच स्त्री आई, मावशी, काकू, आत्या असते त्याप्रमाणे!

Birthday / Anniversary

Priority

September 2010

| M | T | W | T | F | S | S |
|---|---|---|---|---|---|---|
| | | 1 | 2 | 3 | 4 | 5 |
| 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 | 12 |
| 13 | 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 |
| 20 | 21 | 22 | 23 | 24 | 25 | 26 |
| 27 | 28 | 29 | 30 | | | |

8 am दक्षिणाभिमुखे विश्वो मनस्यन्तस्तु तैजसः।
आकाशे च हृदि प्राज्ञस्त्रिधा देहे व्यवस्थितः॥२॥

9
विश्व - दक्षिणाभिमुखे
10 तैजस - मनासि अन्तः [स्थान]
प्राज्ञ - हृदयातील दहराकाशात.

11
ध्यानाला मदत व्हावी किंवा वैयक्तिक अहंभावाचे
12 विश्लेषण करता यावे व त्याचे यथायोग्य आकलन व्हावे
यासाठी श्री गौडपादाचार्य त्या अहंभावाच्या, जाणीवेच्या
1 pm तीन स्तरांवरील कार्यक्षेत्राबद्दल अधिक तपशील देतात.
छांदोग्य उपनिषदातील ८ व्या अध्यायातील १५व्या
2 खंडातील पहिलाच मंत्र आहे.
यः एषः अक्षिणि पुरुषः दृश्यते एष आत्मा इति।
3 बृहदारण्यक उपनिषद अध्याय ४ था ब्राह्मण २ मधील
२ रा मंत्र आहे - इन्धः वै नाम एषः य अयं दक्षिणे अक्षन् पुरुषः।
4 त्यानुसार 'विश्व' याचे स्थान उजव्या डोळ्यात तर
'तैजस'चे स्थान मनाच्या आत आणि 'प्राज्ञ'चे स्थान
5 हृदयातील दहराकाशात (जवनिकांच्या मधील पोकळीत) आहे.
'विश्व' ला स्वप्नातील वा सुषुप्तितील स्मृती असते,
6 तैजसला जागृती मुळीच आठवत नाही. व प्राज्ञ ला
तर काहीच आठवत नाही. जागृतीतसुद्धा बाहेरील ठसे
7 थांबले तरच स्वप्न/सुषुप्तीतील स्मृती येते. म्हणजेच
थोडे स्वस्थ बसले तरच स्वप्न आठवते.
स्वामी चिन्मयानंद - शुद्ध जाणीव किंवा जाणीवशक्ती
ही हृदयाच्या पोकळीत असते. परंतु त्यावेळी तिथे तिला
अनुभवायला, पहायला काही वेगळे नसते म्हणून ती
कार्य करत नाही.

Birthday / Anniversary

© www.madhugeeraghuveer.com

विश्वो हि स्थूलभुङ्नित्यं तैजसः प्रविविक्तभुक् ।
आनन्दभुक्तथा प्राज्ञस्त्रिधा भोगं निबोधत ॥३॥

विश्व हा स्थूल वस्तूंचा भोग घेतो. तैजस सूक्ष्म म्हणजे विषय स्पर्श रहित वस्तूंचा भोग घेतो व प्राज्ञ हा आनंदाचा भोग घेतो हे तू समजून घे.

जागृतीत खरे/प्रत्यक्ष भोग हवे असतात. नुसते बोलून/पाहून/ऐकून पोट भरत नाही. खरे अन्न हवे.

बोलाचीच कढी बोलाचाच भात [भोग]
जेवुनिया तृप्त कोण झाला?

स्वप्नात मात्र प्रत्यक्ष न खाता सुद्धा आंब्याची चव जाणवते. परदेशात फेरफटका मारून येतो. अग्नीशी/पुराशी सामना करतो. कारण तिथे सूक्ष्म भोग असतात. किंवा दुसऱ्या अर्थाने सुटे सुटे भोग घेता येतात. अकल्पित गोष्टी एकत्र येतात.

प्रविविक्त – अत्यंत सूक्ष्म किंवा सुटा सुटा.

सुषुप्तिमध्ये मात्र कोणतेच भोग नसतात. तिथे केवळ आनंदच असतो.

स्थूलं तर्पयते विश्वं प्रविविक्तं तु तैजसम् ।
आनन्दश्च तथा प्राज्ञं त्रिधा तृप्तिं निबोधत ॥४॥

भोगानंतर आता तृप्ती विषयी सांगतात [तृप्ती]

विश्व स्थूल पदार्थांनी तृप्त होतो. तैजस सूक्ष्म पदार्थांनी तर प्राज्ञ आनंदाने तृप्त होतो.

जागृती व स्वप्नावस्थेतील भोग हे Objective म्हणजे व्यक्तिसापेक्ष, वस्तुसापेक्ष, कालसापेक्ष असतात. परंतु सुषुप्तिमधील तृप्ती ही विषयनिरपेक्ष असते. सर्वांच्या पलीकडील असते. हे तू समजून घे.



©www.madhavpeerwer.com

त्रिषु धामसु यद् भोज्यं भोक्ता यश्च प्रकीर्तित:।
वैदैतदुभय यस्तु स भुञ्जानो न लिप्यते॥५॥

जाणीवेच्या तीन अवस्थांमध्ये त्यांच्यासमवेत असणारे अनुभावक – अनुभव घेणारे व अनुभाव्य – ज्याचा अनुभव घ्यायचा ते – या दोघांनाही जो जाणतो तो त्यांचा उपभोग घेत असूनही त्यामुळे लिप्त होत नाही.

नाटक, सिनेमातील कलाकार ती ती भूमिका रंगवत असताना त्यापासून अलिप्त असतात. कलात्मक तटस्थ्य

आपण सुद्धा विविध परिस्थितीत वेगवेगळ्या भूमिका निभावत असतो. पण त्यापासून वेगळेपणाने राहून विचार करत असतो, निर्णय घेत असतो.

ज्ञानी 'स्व' चे खरे रूप जाणतात. त्या त्या नात्याने अनुभव घेताना ते अलिप्त राहू शकतात. त्यामुळे विश्व, तैजस, प्राज्ञ या भूमिकेतून अनुभव घेताना आतील खरा मी तटस्थच असतो. तो या अनुभवाच्या गुंत्यात अडकत नाही. संत असेच जीवन जगतात. सगळ्यात राहून देखील कशातच नसतात. अनुभव घेऊन तो नियत सोडून देतात. रामनाम ग्रासोग्रासी । जो जेविलाचि उपवासी ।

अन्न हे पूर्णब्रह्म असे म्हणणारा स्वत: ब्रह्मच असतो म्हणजे ब्रह्मच ब्रह्म भोगत असतो. हे रहस्य ज्याला समजते तो या सर्वांकडे एक गंमत म्हणून बघत असतो.

भोक्ता काय किंवा भोज्य काय हे एकाच मूळ कारणापासून निर्माण झाले आहे. सर्वत्र एकच ब्रह्म व्यापून आहे हे ज्याने जाणले तो संसारात असला तरी व्यवहारांनी लिप्त होत नाही. ब्रह्म हे कारण व जगत् हे कार्य आहे. ∴ या विचारसरणीला सत्कार्यवाद म्हटले जाते.

October 2010

| M | T | W | T | F | S | S |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | 1 | 2 | 3 |
| 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 |
| 11 | 12 | 13 | 14 | 15 | 16 | 17 |
| 18 | 19 | 20 | 21 | 22 | 23 | 24 |
| 25 | 26 | 27 | 28 | 29 | 30 | 31 |

*Priority*

SUN SEP 26 2010

Wk 38, 269-096

६ ऑक्टोबर १८

प्रभवः सर्वभावानां सतामिति विनिश्चयः।
सर्वं जनयति प्राणश्चेतोंऽशून् पुरुषः पृथक्॥६॥

या कारिकेत अद्वैतींचा सद्वाद स्पष्ट केला आहे. भू म्हणजे होणे, प्रकट होणे व भाव म्हणजे प्रगट झालेले.

सचेतन आणि अचेतन वस्तू आम्ही या जगात पाहतो म्हणजेच त्या प्रगट झालेल्या असतात, म्हणजेच कार्यरूपात (Finished Product) दिसतात. जिथे कार्य आहे तिथे कारण असणारच. (Where there is a Creation there must be a creater)

या सर्व गोष्टींचे जे मूळ कारण आहे - अस्तित्वात आहे, त्याला सत म्हणतात. भोक्ता व भोग्य यांचे आकार, गुण सर्व काही निरनिराळे आहेत. पृथक् आहेत. परंतु ते दोन्ही एकाच कारणातून प्रकट झाले आहेत. एकच चैतन्य सर्वांना निर्माण करते. त्यातून नानात्वाने हे विश्व प्रकट होते.

सुरुवातीला नुसता लाल गोळा असणाऱ्या सूर्यामधून सहस्रावधि किरणे बाहेर पडतात, तसेच त्या परम पुरुषामधून ही चैतन्य किरणे बाहेर पडतात. किंवा घडी केलेल्या, लहान रूपात असलेल्या वस्त्रात जे असते तेच घडी उलगडून पसरलेल्या वस्त्रात असते. तसेच परब्रह्मात सामावलेले तेच तत्त्व प्रकटते व विश्वरूपाने दिसू लागते. ते एकमेवाद्वितीय आहे. छान्दोग्य — सदेव सौम्य अग्र आसीत।

सत् हेच प्रथम होते. काही नसल्यातून काही असणे उत्पन्न होणे शक्य नाही. माउलींच्या मते हा त्या चिद्‌चाच विलास आहे. तर तुकाराम महाराज म्हणतात. ही त्या "कार्याच बीज आहे. वृक्षाचा विस्तार प्रचंड असला तरी बीज सूक्ष्म असते. तसेच कारणात बीजरूपाने कार्य असतेच. जे कारणात असते तेच कार्यात येऊ शकते. कारणात असणारे चैतन्यतत्त्व कार्यरूपाने प्रगट होते.

©www.madhaveeraghuveer.com

Birthday / Anniversary

| September 2010 | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| M | T | W | T | F | S | S |
| | | 1 | 2 | 3 | 4 | 5 |
| 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 | 12 |
| 13 | 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 |
| 20 | 21 | 22 | 23 | 24 | 25 | 26 |
| 27 | 28 | 29 | 30 | | | |

विभूतिं प्रसवं त्वन्ये मन्यन्ते सृष्टिचिन्तकाः।
स्वप्नमायासरूपेति सृष्टिरन्यैर्विकल्पिता ॥७॥

सृष्टी-उत्पत्तिसंबंधी विविध लोक विविध उपपत्ती सांगतात
१. सृष्टी ही परमात्म्याच्या ऐश्वर्याचे प्रकटीकरण आहे.
२. सृष्टी भासते पण खरी नाही. केवळ सृष्टी हे परमात्म्याला पडलेल्या स्वप्नाप्रमाणे आहे.
गौडपादाचार्यांचा अजातवाद सांगतो की विश्वनिर्मिती झालीच नाही. आपण ओळखतो ते वस्तुजगत हे आपणच केलेल्या मानसिक प्रकल्पना व्यतिरिक्त काहीही नाही
अजातवाद — अगा जे जालेचि नाही। त्याची वार्ता पुससी काई
सृष्टीचिंतक - सृष्टी म्हणजे ईश्वराच्या विभूति विस्तार आहे
गारुडी जादूने आकाशात दोर भिरकावतो त्यावरून चढून स्वर्गात जातो. देवांच्या मदतीसाठी दानवांशी युद्ध करतो. त्याचे तुकडे खाली पडतात. परंतु हे सर्व खरे नाही. खरा गारुडी वेगळाच असतो. त्याने मायेने (जादू) स्वतःला झाकून घेतले असते, त्या दोरीवर चढून गेलेल्या गारुड्याप्रमाणे प्राज्ञ, तैजस व विश्व आहेत. ते खरे नाहीत भास आहेत.

इच्छामात्रं प्रभोः सृष्टिरिति सृष्टौ विनिश्चिताः।
कालात्प्रसूतिं भूतानां मन्यन्ते कालचिन्तकाः ॥८॥

सृष्टीवादी किंवा जगत् उत्पत्तिवादी मानतात की सृष्टी प्रभूच्या इच्छेने निर्माण झाली तर कालवादी समजतात की भूतमात्रांची उत्पत्ति कालापासून झाली आहे.

Birthday / Anniversary

8 am श्वेताश्वतर उपनिषदात अशीच विद्वानांची चर्चा आहे.
काल, स्वभाव, नियती, यदृच्छा, पंचमहाभूते, पुरुष इ०
9 वेगवेगळे पर्याय मते सुचवतात व साधकबाधक
चर्चा करतात. यातील प्रत्येक मताचे खंडन केले आहे.
10 सृष्टीवादी — ईश्वरेच्छा हेच सृष्टी-उत्पत्तीचे कारण आहे.
कालवादी = काल हेच कारण आहे. दृश्यजगत - कालापासून झाले
11 श्री. शंकराचार्य - परमेश्वर सत्य संकल्प आहे. त्यामुळे त्यांनी
निर्मिलेली सृष्टी संकल्पमात्र आहे.

12

भोगार्थं सृष्टिरित्यन्ये क्रीडार्थमिति चापरे।
1 pm देवस्यैष स्वभावोऽयमाप्तकामस्य का स्पृहा ॥९॥

2 काहींच्या मते परमेश्वराने भोगासाठी सृष्टी निर्माण केली.
तो निरवयव आहे. त्याला भोग घेता येत नाहीत. तेव्हा
3 तो या सृष्टीच्या मार्फत भोग घेतो. तर काहींच्या मते ही
त्याची क्रीडा आहे. कारण जो पूर्णतृप्त असतो त्याला इच्छा
4 तरी कसली असणार? काहींच्या मते सृष्टि निर्माण करणे
हा त्याचा स्वभावच आहे. (बीजाचा स्वभाव - अंकुरणे,
5 वाढणे, अग्नीचा स्वभाव दाहकता) त्यामुळे त्याच्या
स्वभावानुसार तो विकसित झाला. या सृष्टीची
6 घडामोड त्याच्या स्वभावामुळे घडते.

7

निवृत्ते सर्वदुःखानामीशानः प्रभुरव्ययः।
अद्वैतः सर्वभावानां देवस्तुर्यो विभुः स्मृतः ॥१०॥

अपरिवर्तनीय, सर्वांवर नियंत्रण ठेवणारा असा प्रभु
हा सर्व दुःखांचा शेवट असतो. अस्तित्वात असणाऱ्या
सर्व जीव व गोष्टींमध्ये तो अद्वैतरूपाने स्थित आहे.

Birthday / Anniversary

© www.madhaveeraghuveer.com

तो सर्वव्यापी (विभु) देव - सदैव प्रकाशमान म्हणजे चौथी तुरीय अवस्था असे म्हटले आहे.

माण्डुक्य उपनिषदातील सातव्या मंत्रात परमात्मतत्त्व म्हणजे तुरीय अवस्था हे विस्ताराने सांगितले आहे. अधिक करून व्यतिरेक पद्धतीने हा सिद्धांत मांडला आहे ते परमतत्त्व कधी न बदलणारे सर्वांवर नियंत्रण करणारे आहे. तो सर्वांचा प्रभु आहे. सर्व दुःखे तिथे संपतात. तिथे केवळ आनंदच आहे. तो सर्वांना व्यापून शिल्लक राहतो. ही चौथी तुरीय अवस्था आहे.

ही स्थिती प्राप्त करणे हे जीवनाचे ध्येय असायला हवे इथे व्यय नाही - विविधतेला जाणे म्हणजे व्यय. त्याउलट विविधता नसणे, आहे नसेच राहणे म्हणजे अव्यय। तो ईशान - नियंत्रक समर्थ आहे. तिथे सर्व दुःखे संपतात. आधिभौतिक, आध्यात्मिक, आधिदैविक। केवळ आनंद।

अस्तित्वात आलेल्या सर्व गोष्टीत हा अव्यक्तरूपाने असतोच. तो स्वयंप्रकाशी आहे.

कार्यकारणबद्धौ ताविष्येते विश्वतैजसौ
प्राज्ञः कारणबद्धस्तु द्वौ तौ तुर्ये न सिद्ध्यतः ॥११॥

कार्य हे फलस्वरूप आहे तर कारण हे बीजस्वरूप आहे विश्व व तैजस हे दोन्ही फल व बीजभाव यांनी बद्ध आहेत. तर प्राज्ञ हा कारणाने - बीजभावाने बद्ध आहे. परंतु ते दोन्ही (फल व बीज) भाव तुर्यमध्ये नाहीत

शंकराचार्य म्हणतात - शुद्ध तत्त्वाचे अग्रहण हा बीज भाव आहे तर अन्यथा ग्रहण / विपरीत ग्रहण हा फलभाव आहे. म्हणजेच आपले मूळ स्वरूप विसरल्यामुळे व विपरीत धारणा करून घेतल्यामुळे विश्व व तैजस या स्थिती प्राप्त होतात तर सुषुप्तावस्थेमध्ये केवळ



© www.mahaveeraghuveer.com

विस्मरण आहे. तिथे विपरीत धारणा नाही व तुरीया अवस्थेत तर विस्मरण नाही. विपरीत धारणा नाही तुरीयावस्था ही शुध्दावस्था आहे.

चिन्मयानंद म्हणतात — जागृती (विश्व) स्वप्न (तैजस) व सुषुप्ति (प्राज्ञ) हे जीवात्मे म्हणजे तुरीय अवस्थेतील सत्यस्वरूपावरील केवळ ३ भ्रामक आभास आहेत.

नात्मानं न परांश्चैव न सत्यं नापि चानृतम् ।
प्राज्ञः किंचन संवेत्ति तुर्यं तत्सर्वदृक् सदा ॥१२॥
(माण्डूक्य)

सुषुप्तिमधील प्राज्ञ हा स्वतःलाही जाणत नाही व इतरांनाही जाणत नाही. खरे-खोटे जाणत नाही. परंतु तुरीय मात्र सर्वदृक्, सर्वज्ञ व सर्वसाक्षी आहे.

प्राज्ञ द्वैत जाणत नाही. कारण त्यात अज्ञान असले तरी विपरीत ज्ञान नाही. म्हणजे कारण असले तरी फळ नाही. गाढ झोपेत जगाचे, स्वतःचे, सत्यासत्याचे विस्मरण होते. मात्र तिथे चित असतेच पण त्या चितच्या अस्तित्वाची जाणीव ठेवणारा मी नसतो. परंतु त्यावेळच्या अज्ञानाचा अनुभव त्यावेळी कळत नाही. मात्र स्मृतिरूपाने जागे झाल्यावर तो अनुभव आठवतो.

चिन्मयानंद - सुषुप्तिमध्ये तो प्रकर्षेण अज्ञ (प्राज्ञ) असतो तर तुरीय अवस्थेत तो प्रकर्षेण ज्ञ असतो.

जागृती व स्वप्न या अवस्था तुरीयावस्थेहून सर्वस्वी भिन्न आहेत. मात्र सुषुप्ति व तुरीय यातील भेद नीटसा कळत नाही. सुषुप्तित मूर्तिमंत अज्ञान असते तर तुरीय अवस्थेत शुध्द ज्ञान आहे. तुरीय अवस्था सर्व भेदरहित व सर्वांपासून अलिप्त असल्यामुळे सर्वसाक्षी असतो. तो एकात्मसार आहे. आत्म्याच्या साक्षीभावामुळे आपल्याला अनुभव समजतात.

Birthday / Anniversary

October 2010

| M | T | W | T | F | S | S |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | 1 | 2 | 3 |
| 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 |
| 11 | 12 | 13 | 14 | 15 | 16 | 17 |
| 18 | 19 | 20 | 21 | 22 | 23 | 24 |
| 25 | 26 | 27 | 28 | 29 | 30 | 31 |

द्वैतस्याग्रहणं तुल्यमुभयोः प्राज्ञतुर्ययोः ।
बीजनिद्रायुतः प्राज्ञः सा च तुर्ये न विद्यते ॥ १३ ॥

मी विरघळलो की त्या परब्रह्माशी एकरूपता प्राप्त जर होणार असेल तर झोपेत तो मी विरघळून जातो मग तेव्हा ब्रह्मज्ञान होते का?

ब्रह्मज्ञानात सर्वात मोठा अडथळा 'मी'चा असतो. मी आलो की तू आला. म्हणजेच द्वैत आले. मात्र प्राज्ञ व तुरीय अवस्थेत द्वैत शिल्लक राहत नसले तरी प्राज्ञास्थितीत मूळ स्वरूपाची विस्मृती असते. गाढ झोपेमध्ये जसा 'मी' उरत नाही तसेच मूळ स्वरूपाचेही भान नसते. तुर्या मात्र ज्ञानाची अवस्था आहे. तिथे स्वरूपाची पूर्ण जाण असते. तुरीय अवस्था ही निरंतर, सर्वव्यापी, असीम शाश्वत, परिपूर्ण ज्ञानाची अवस्था आहे. ती कारण ही नाही व कार्य ही नाही. ती निरपेक्ष, शुद्ध अवस्था आहे.

वरदानंद — निद्रेमध्ये तत्त्वाविषयी अज्ञान असते, तिथे सत्याच्या वास्तव स्वरूपाचे आकलन होत नाही. हे अज्ञानच द्वैत निर्माण करते, विविधतेचा विस्तार करते. म्हणून तत्त्वाविषयी अज्ञानाला इथे 'बीजनिद्रा' म्हटले आहे. तुरीय आत्म्याच्या ठिकाणी अज्ञान कधीच नसते तर सदैव साक्षीभाव असतो.

प्राज्ञ - काहीच कळत नसल्यामुळे द्वैताचे भान नाही.
तुरीय - सर्वच कळते म्हणून " " ".

स्वप्ननिद्रायुतावाद्यौ प्राज्ञस्त्वस्वप्ननिद्रया ।
न निद्रां नैव च स्वप्नं तुर्ये पश्यन्ति निश्चिताः ॥ १४ ॥

पहिले दोन (विश्व व तैजस) हे स्वप्न व निद्रा यांच्याशी संबंधित असतात. तथापि प्राज्ञ ही स्वप्नरहित निद्रेची अवस्था असते. सत्यतत्त्व जाणणारे (निश्चिता) मात्र तुरीयावस्थेत स्वप्नही पाहत नाहीत वा निद्रेतही नसतात.

Birthday / Anniversary

© www.madhuveer.com

७ ऑक्टोबर ९८

विश्व व तैजस हे जागृती व स्वप्नांशी संबंधित असतात असे न म्हणता स्वप्न व निद्रेशी जोडलेले असतात असे म्हटले आहे, व प्राज्ञ अस्वप्ननिद्रेने युक्त असतो, असे म्हटले आहे. ते का? हे पुढे स्पष्ट होते.

निद्रा म्हणजे अज्ञान व
स्वप्न म्हणजे विपरीत ज्ञान!

जागृतीमध्ये स्वरूपाचे अज्ञान आहे व जगातील विविधतेचे विपरीत ज्ञान आहे. म्हणून त्यांना निद्रा-स्वप्नांनी युक्त म्हटले आहे. तर प्राज्ञमध्ये ~~निद्रा म्हणजे~~ अज्ञान असले तरी विपरीत ज्ञान नाही. म्हणून अस्वप्न म्हटले आहे.

प्राज्ञः तु अस्वप्ननिद्रया।

थोडक्यात प्राज्ञमध्ये स्वरूपाचे, आत्मतत्त्वाचे विस्मरण म्हणजे अज्ञान आहे तर विश्व, तैजसमध्ये अज्ञान व त्याचे कार्य म्हणून विपरीत ज्ञान आहे.

जागृतीत जगात दिसणारे नानात्व खरे वाटते तर स्वप्नात आपणच उभारलेले जग त्यावेळी खरे वाटते.

परंतु तुरीया अवस्थेत मात्र निद्रा म्हणजे अज्ञान नाही व स्वप्न म्हणजे विपरीत ज्ञान देखील नाही. केवळ शुद्ध ज्ञान आहे. विश्व व तैजस कार्य कारण बद्ध आहेत प्राज्ञ कारणबद्ध आहे. परंतु तुरीय सर्वांहून वेगळा आहे.

अन्यथा गृह्णतः स्वप्नो निद्रा तत्त्वमजानतः।
विपर्यासे तयोः क्षीणे तुरीयं पदमश्नुते ॥१५॥

विपरीत ज्ञान म्हणजे जे आहे त्यापेक्षा वेगळे समजणे. म्हणजे दोरीला दोरी न समजता साप समजणे
अज्ञान - म्हणजे तत्त्वाविषयी ज्ञान नसणे.

त्यामुळे स्वप्नात अज्ञान असते व विपरीत ज्ञान असते
(इथे जागृतीचा उल्लेख नसला तरी स्वप्नातच अंतर्भूत आहे)

Birthday / Anniversary

मात्र अज्ञान व विपरीत ज्ञान दूर सरले की तुरीय स्थिति (शुद्ध ज्ञान) प्राप्त होते. अज्ञान सरले की जग ही संपते व स्वप्नही संपते. कारण राहिले नाही की कार्यही उरत नाही.

अनादिमायया सुप्तो यदा जीवः प्रबुध्यते।
अजमनिद्रमस्वप्नमद्वैतं बुध्यते तदा॥१६॥

अनादि मायेच्या प्रभावाने झोपलेल्या जीवाला जेव्हा जाग येते तेव्हा त्याला जन्म न घेणाऱ्या, निद्रा न घेणाऱ्या, स्वप्न न पाहणाऱ्या अद्वैताचे ज्ञान होते. म्हणजेच त्या तत्वाचा साक्षात्कार होतो. मी नित्य स्वरूप आहे, जीवस्वरूप नाही हे ध्यानात येते.

ही चौथी अवस्था ध्यानसाधना व वेदांतसाधनेच्या द्वारे प्राप्त होऊ शकते. तो प्रबुद्ध होतो, आत्मतत्वाची जाण येते. ऐतरेय उपनिषदानुसार परमेश्वराने अवयव व शरीर निर्माण केले परंतु त्यात हालचाल नव्हती. तेव्हा त्याने स्वतःच त्या देहात मस्तकातून (ब्रह्मरंध्र) प्रवेश केला, व त्याला चेतन बनवले, तीच चित् शक्ती।

ही चित्शक्ती ज्यावेळी शरीरात शिरली त्यावेळी ती देहाशी तादात्म्य पावली व तिला जीव-दशाप्राप्त झाली. हे उपाधिचे तादात्म्य सुटणे म्हणजेच स्वरूपज्ञान होणे. देहाला सर्वस्व मानणे हे मूळस्वरूपाचे अज्ञान आहे.

जे चित् तत्व, मूळ तत्व आहे ते जन्मत नाही, मरत नाही. ते असतेच असते. त्याला निद्रा, स्वप्न नाही. ते एकमेवाद्वितीय, अद्वैत आहे हा बोध होणे म्हणजेच तुरीय अवस्था प्राप्त होणे.

जगातील सर्व लोक सत्यस्वरूपाला जाणत नाहीत. म्हणूनच ते अज्ञानी आहेत. निद्रित आहेत. एकदा काही



© www.madhaveeraghuveer.com

अज्ञाननिद्रा गेली की सीमितत्वाच्या, मर्त्यत्वाच्या, अनित्यत्वाच्या सर्व संकल्पना गळून पडतात. जीवभावासाठी संसार असतो. एकदा जीवभाव गेला की संसार संपला.

त्याअर्थी ते अनिद्र, अस्वप्न आहे त्याअर्थी ते अज व अद्वैत आहे. आत्म्यात आत-बाहेर असा भेद नाही. जन्माचे कारण अविद्या आहे. इथे अविद्या निद्रा नाही आणि म्हणून स्वप्न नाही. ते तत्त्व अजन्मा आहे.

प्रपञ्चो यदि विद्येत निवर्तेत न संशयः ।
मायामात्रमिदं द्वैतमद्वैतं परमार्थतः ॥१७॥

हा दृश्यस्वरूप दिसणारा प्रपंच-पसारा जर खरा असेल तर तो निःसंशयपणे तो निवृत्त (नाहीसा) होईल. अदृश्य होईल. द्वैत म्हणजे माया आहे. व परमार्थतः सर्व अद्वैतच आहे.

एकत्वावर नानात्व दिसते. तो भ्रम आहे. द्वैत ही माया आहे. परमार्थदृष्टीने त्याचे खरे स्वरूप अद्वैतच आहे. पाण्यावर तरंग उठतात. सोन्यापासून अलंकार होतात.

दिसते तसे नसणे म्हणजे माया! ती असत्य म्हणजे खोटी नाही तर मिथ्या (नाश पावणारी) आहे. एकदा या भ्रमाची निवृत्ती झाली की सर्वत्र अद्वैत आहेच.

विकल्पो विनिवर्तेत कल्पितो यदि केनचित् ।
उपदेशादयं वादो ज्ञाते द्वैतं न विद्यते ॥१८॥

एखाद्याने जर विविध कल्पना केल्या तर त्या नाहीशा होतील. हे विधान केवळ समजण्यापुरते केले आहे. स्पष्टीकरणात मानलेले द्वैत अस्तित्वात नाही. सत्याची अनुभूती आली की ते नाहीसे झालेले असते.



© www.madhaveeraghuveer.com

5 TUE OCT 2010 — Priority

Wk 40, 278-087

October 2010

| M | T | W | T | F | S | S |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | 1 | 2 | 3 |
| 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 |
| 11 | 12 | 13 | 14 | 15 | 16 | 17 |
| 18 | 19 | 20 | 21 | 22 | 23 | 24 |
| 25 | 26 | 27 | 28 | 29 | 30 | 31 |

प्रपंच अस्तित्वात नाही असे विधान केले आहे, मग आम्ही ज्यात वावरतो, पाहतो ते सर्व भ्रामक मानायचे का? माता पिता, गुरु, शास्त्रग्रंथ हे भ्रामक करते काय मानणार? या शंकांचे निरसन करण्यासाठी व्यावहारिक सत्ता, प्रातिभासिक सत्ता हे शब्द आले आहेत.

सत्यस्वरूपाला पारमार्थिक संज्ञा म्हणतात. व्यवहारात जी भिन्नता दिसते ती व्यवहारापुरतीच आहे. त्या पूर्णपदापर्यंत पोहोचेपर्यंत (गुरु-शिष्य) हे द्वैत असते, एकदा का ती अनुभूती आली की द्वैत संपते.

विकल्पाने द्वैत भासते हे एकदा मान्य केले की कोणतेही द्वैत हा विकल्पच आहे हे समजते. सर्व भेद नष्ट अद्वैतात होतात. हा बोध झाल्यावर व्यावहारिक पातळीवर भेद राहिला तरी तो बाधत नाही.

अद्वैताची अनुभूती येईपर्यंत शिकवायला गुरु हवा. पण अद्वैताची " आल्यावर भेद उरत नाही. दोन्ही दिवे, आरसे सारखेच! दोघेही ब्रह्मच!

विश्वस्यात्व विवक्षायामादिसामान्यमुत्कटम् ।
मात्रा संप्रतिपत्तौ स्यादाप्तिसामान्यमेव च ॥ १९॥

Birthday / Anniversary

© www.madhavraghuveer.com

६ ऑक्टोबर १८

तैजसस्योत्वविज्ञान उत्कर्षो दृश्यते स्फुटम्।
मात्रासंप्रतिपत्तौ स्यादुभयत्वं तथाविधम्॥२०॥

जागृतस्थानातील विश्वाचे अकाराशी दोन प्रकारांनी साम्य दाखवून झाल्यानंतर आता तैजसाचे व उकाराचे दोन प्रकारांनी साम्य दाखवतात. उ म्हणजे उत्कर्ष म्हणजेच श्रेष्ठत्व! तसेच उ म्हणजे दोहोंच्या मध्ये असणे. अ आणि म च्या मध्ये उ आहे. तसेच जागृती व सुषुप्तिच्या मधली अवस्था स्वप्न आहे. हे स्पष्ट आहे. ∴ तैजस व उ मध्ये साम्य आहे.

मकारभावे प्राज्ञस्य मानसामान्यमुत्कटम्।
मात्रा संप्रतिपत्तौ तु लयसामान्यमेव च॥२१॥

मा या धातूचा अर्थ आहे मोजणे, मापणे. मात्रा व मान किंवा प्रमाण, मिती हे शब्द त्यापासूनच झाले आहेत.
प्राज्ञ आणि ओंकारातील 'म' ही तिसरी मात्रा यात साम्य काय आहे? मोजणे, मापन करणे वा लय करणे हा दोन्हींचा स्वभाव किंवा सामान्य गुण आहेत.
'अ' व 'उ' हे ध्वनी 'म'कारात विलीन पावतात असे वाटते. तसेच सुषुप्तितून जाग आल्यावर विश्व व तैजस कार्य करतात. जणू ते त्याच्यातून बाहेर पडतात. जसे मापातून द्रव पदार्थ बाहेर टाकावा तसे!

Birthday / Anniversary

8 am त्रिषु धामसु यत्तुल्यं सामान्यं वेत्ति निश्चितः।
सः पूज्यः सर्वभूतानां वन्द्यश्चैव महामुनिः ॥२२॥

9 जाणीवेला तिन्ही अवस्थांमध्ये - जागृती, स्वप्न, 10 सुषुप्ति - हे तुलनेने समान आहे ते जो निश्चितपणे जाणतो तो सर्व भूतांना वंदनीय महामुनीप्रमाणे असतो.

11 शंकराचार्य — जागृति, स्वप्न, सुषुप्ति या तीन स्थानात विश्व, तैजस व प्राज्ञ हे पाद आणि अकार, उकार व 12 मकार यांचे तुल्य -
हे सामान्य ' हे असेच आहे असे निश्चितपणे जो 1 pm जाणतो तो ब्रह्मविद होतो. पूज्य, वंद्य महामुनी होतो

वरदानंद - या तिन्ही अवस्था नीट जाणून त्या 2 परस्परांशी एकरूप झाल्या पाहिजेत. त्यांच्यामध्ये सामंजस्य व सहयोग हवा. जागृतीवर स्वप्न व सुषुप्ति 3 आणि सुषुप्तिवर स्वप्न, जागृती अवलंबून आहे.

आत्म्याला एकत्वाच्या साक्षात्कारामुळे महानता लाभते. 4 म्हणूनच तो व्यापक होतो. या तिन्ही अवस्थांमध्ये चैतन्य समानरूपाने आहे. वेगवेगळ्या ठिकाणी ते वेगवेगळे 5 काम करते इतकेच। हे जो जाणतो तो श्रेष्ठ महामुनी ठरतो.

6 अकारो नयते विश्वमुकारश्चापि तैजसम्।
मकारश्च पुनः प्राज्ञं नामात्रे विद्यते गतिः ॥२३॥

7 अकार विश्वाप्रति नेतो. म्हणूनच अकारावर ध्यान केले असता जागृत अवस्थेतील चांगले ध्यानफल प्राप्त होते. उकारावर ध्यान केंद्रित केले असता तैजस व्यक्तिमत्व म्हणजे चांगले मन व बुद्धी प्राप्त होते. तर मकारावर ध्यान केंद्रित केले असता योग्य अशी प्राज्ञ अवस्था प्राप्त होते. परंतु शेवटची तुरीयावस्था मात्र

Birthday / Anniversary

©www.madhaveeraghuveer.com

अमात्र आहे. त्यात मात्रा नाही, गती नाही, त्याला कुठे जाण्याची गरज नाही.

शंकराचार्यांच्या मते अकारावर ध्यान - वैश्वानराची प्राप्ती | उकारावर ध्यान - ~~~ हिरण्यगर्भाची प्राप्ती | आणि मकारावर ध्यान - अव्याकृताची प्राप्ति होते.

अमात्र ची मात्र कोणतीही गती नसते.

वरदानंद — अकारातून — विवेकशक्ती व कर्तृत्व
उकारातून — सहानुभूती, करुणा, पावित्र्य
मकारातून — समाधान, प्रसन्नता लाभते.

असा हा स्थूलातून सूक्ष्म, सूक्ष्मातून अव्याकृत व पुढे मूळ ब्रह्म |

स्थूल → सूक्ष्म → अव्याकृत → मूळ ब्रह्म

ओंकारं पादशो विद्यात् पादा मात्रा न संशयः |
ओंकारं पादशो ज्ञात्वा न किञ्चिदपि चिन्तयेत् ||२४||

ॐकाराच्या साधनेविषयी मार्गदर्शन केले आहे.

चिन्मयानंद — ॐकार जप करताना 'अ' 'उ' व 'म' या वर्णांवर ध्वनीचे आरोहण होत राहील त्यावेळी त्यावर विश्व, तैजस व प्राज्ञ चा अध्यारोप करायचा व शेवटी त्यापुढील प्रगाढ शांतीचा अनुभव घ्यायचा. या आंतरिक शांतिपर्यंत पोहोचल्यावर नवीन विचारतरंग उठू द्यायचे नाही. ही शांती आत्मपर्यंत पोहचते.

शंकराचार्य - ओंकाराला पादशः जाणावे, पादच मात्रा आहेत. त्याला पादशः (सुटे सुटे) जाणून कसलेही चिंतन करू नये.

आत्म्याचे पाद व ओंकाराच्या मात्रा यात साम्य आहे. " " विभाग " " वर्ण " " आहे.

यावर श्रद्धा ठेवून ॐकारोपासना केल्यास ती ब्रह्मापर्यंत पोहोचवते हे निश्चित.

Birthday / Anniversary

© www.madhaveeraghuveer.com

Priority



३० ऑक्टोबर २०१८
- घटस्थापना -

8 am मुञ्जीत प्रणवे चेतः प्रणवो ब्रह्म निर्भयम्।
प्रणवे नित्ययुक्तस्य न भयं विद्यते क्वचित्॥२५॥

9

मनाला प्रणवाशी जोडून टाका. मन प्रणवाने भरून
10 टाका. त्या ध्वनीशी मन एकरूप करा. ओंकार-प्रणव
हा निर्भय ब्रह्मच आहे. जो प्रणवाशी नित्य जोडला
11 जातो, त्याला कसलेच भय उरत नाही.
विचारांचा पसारा आटोक्यात आणा. ओंकाराशिवाय
12 मनात दुसरा विचारच येऊ द्यायचा नाही. मन ओंकाराशी
एकरूप केले की हे आपोआपच होते. ॐकार हेच ब्रह्म
1 pm असल्याने मन ब्रह्माचीच अनुभूती घेते.
अंतःकरण ॐकाराशी जोडायचे म्हणजे प्रणवाचे ध्यान
2 एकाग्रतेने साधायचे. दीर्घकाल अभ्यासामुळे मन सतत जोडले
रहाते. त्याच्या जोडीला सदाचरण, विषयाविषयी अलोलुपता,
3 अनासक्ती आणि श्रद्धा असली की मार्ग सुकर होतो.
वासना, कामना, अपेक्षा यामुळे भय असते. तसेच भेद
4 विविधता, द्वैत हे वासनांचे अधिष्ठान असते. ॐकार हा
भेद, द्वैत मिटवते म्हणून भय उरत नाही.

5

प्रणवो ह्यपरं ब्रह्म प्रणवश्च परः स्मृतः।
6 अपूर्वोऽनन्तरोऽबाह्योऽनपरः प्रणवोऽव्ययः॥२६॥

7 कठोपनिषदात यम-नचिकेता संवाद आहे. त्यात
यमदेव ॐकाराचे महत्त्व स्पष्ट करताना म्हणतात.
एतदालम्बनं श्रेष्ठं एतदालम्बनं परम्।
ओंकार हे परब्रह्मही आहे व अपरब्रह्मही आहे.
प्रणवाच्या पूर्वी काही नव्हते व त्याच्या नंतर काही नाही.
म्हणूनच त्याला कारण नाही व तेही कशाचे कारण नाही.
Birthday / Anniversary त्याला कार्यही नाही. त्याच्या बाहेर काहीच नाही.
अपर म्हणजे कार्य! अनपर म्हणजे ज्याचे कुणीही कार्य नाही ते.

© www.madhaveeraghuveer.com

अनन्तर म्हणजे याच्या बाहेर काहीच नाही.
अनपर - म्हणजे कुठल्याही कार्याशी संबंधित नसलेले!
अव्यय " ज्यात कोणताही बदल होत नाही.
श्री शंकराचार्य — आधुनिक वेदांत — सापेक्ष सत्याला साधकाला व्यक्त सत्याच्या द्वारा अव्यक्त आणि शाश्वत सत्यतत्त्वाकडे जाता येते.

सर्वस्य प्रणवो ह्यादिमध्यमन्तस्तथैव च।
एवं हि प्रणवं ज्ञात्वा व्यश्नुते तदनन्तरम् ॥२७॥

प्रणव हे सर्वांचे उत्पत्तिस्थान स्थिति व लयस्थान आहे. याप्रमाणे प्रणवाला जाणून साधक ते परमश्रेष्ठ सत्स्वरूप प्राप्त करून घेतो.
स्वामी चिन्मयानंद - विवर्तवाद - रज्जु सर्प न्यायाने दोरीवर सर्पाचा भास व्हावा तसा ब्रह्मावर जगाचा भास होतो. त्यावेळी अधिष्ठानरूपी दोरी सर्व काळी सत्य असते —
प्रारंभी, मध्यकाळी (स्थिति) व लयकाळी
अथर्वशीर्षातील गणपती परब्रह्मस्वरूपच आहे.
त्वमेव केवलं कर्तासि — उत्पत्ति
त्वमेव केवलं धर्ताऽसि — स्थिति
त्वमेव केवलं हर्ताऽसि — लय
या सृष्टीत ओंकाराशिवाय काहीच नाही.

प्रणवं हीश्वरं विद्यात सर्वस्य हृदि संस्थितम्।
सर्वव्यापिनमोंकारं मत्वा धीरो न शोचति ॥२८॥

प्रणवालाच सर्वांच्या हृदयात असणारा ईश्वर जाणावे. ॐकार सर्वव्यापी आहे हे जाणून विवेकी मनुष्य कधीही शोक करत नाही. ॐकार सर्वव्यापी चैतन्य असून तो सर्वांच्या अंतर्यामी राहतो.

Birthday / Anniversary

© www.madhaveeraghuveer.com

October 2010

| M | T | W | T | F | S | S |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | 1 | 2 | 3 |
| 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 |
| 11 | 12 | 13 | 14 | 15 | 16 | 17 |
| 18 | 19 | 20 | 21 | 22 | 23 | 24 |
| 25 | 26 | 27 | 28 | 29 | 30 | 31 |

8 am शंकराचार्य - ॐकाराला असंसारी आत्मा म्हणतात.
छान्दोग्य - तरति शोकमात्मवित
9 श्वेताश्वतर - सदा जनानां हृदये सन्निविष्टः।
भगवद्गीता - अहमात्मा गुडाकेश सर्वभूताशयस्थितः।
10 हृदि सर्वस्य विष्ठितम्।
ईश्वरः सर्वभूतानां हृद्देशेऽर्जुन तिष्ठति।

11 अमात्रोऽनन्तमात्रश्च द्वैतस्योपशमः शिवः।
12 ओङ्कारो विदितो येन स मुनिर्नेतरो जनः ॥२९॥

1 pm ध्वनिविरहित (अमात्र) तसेच अनंतध्वनि असलेला, जिथे द्वैताचा निरास झालेला आहे. जे शिव, शांत, मंगल
2 आहे त्या ॐकाराला ज्याने जाणले तोच खरा मुनी! इतर कुणीही मुनी नव्हे.
3 ब्रह्मविद् ब्रह्म एव भवति - त्याचप्रमाणे ॐकाराचा अनुभव घेतलेला ब्रह्मच होतो.
4 अमात्र म्हणजे तुरीयावस्था आहे. इथे मात्रा नाही ध्वनी नाही, उच्चार नाही. याच्या उलट तो अनंतमात्रही
5 आहे. त्याचा अर्थ सर्व भेदांना, प्रकारांना धारण करणारा तो जो अमात्र आहे तोच अनंतमात्र होऊ शकतो.
6 पाण्याला स्वतःचा रंग नाही ∴ तो कोणताही रंग धारण करू शकतो. तो निराकार आहे म्हणजेच सर्व आकार त्याच्यात समाविष्ट
7 आहेत. जगातील असंख्य भेद हे त्या निर्गुण, निराकार ब्रह्मावर अधिष्ठित आहेत. अनंतमात्रांनी अमात्रच व्यक्त होत असते
हे ज्याला कळले त्याला ब्रह्म कळले.
धीर - धीमध्ये रमणारा - विवेकी - त्याचे निर्णय पूर्ण विवेकाने घेतलेले असतात. सौंदर्य लहरी - मुनी
अनंतमात्र म्हणजे मोजताच येणार नाही असा! ॐकाराला
 मात्रा नाही. त्याचे मापन होऊ शकत नाही.

© www.mahaveeraghuveer.com

२८ ऑक्टोबर २०१८

# वैतथ्य प्रकरण (३८)

डोळ्यांनी जे जग आपण पाहतो त्याची असत्यता (व्यर्थत्व) या प्रकरणात सांगितली आहे. नानात्व दिसते तो वस्तुत: भ्रमच आहे.

द्वैतभाव अस्तित्वातच नाही असे जरी पहिल्या प्रकरणात म्हटले असले तरी ते श्रुतिवचनातील आगम वचनांच्या द्वारे सांगितले होते. तेच भ्रामक स्वरूप युक्तिवादाने आणि तर्काने सिद्ध करण्याकरता हे दुसरे वैतथ्य प्रकरण आहे.

वैतथ्यं सर्वभावानां स्वप्न आहुर्मनीषिण: ।
अन्तःस्थानात्तु भावानां संवृतत्वेन हेतुना ॥१॥

स्वप्नामध्ये जे प्रसंग घडतात, ज्या व्यक्ती, वस्तू दिसतात त्या आपल्याच आतमध्ये असतात. आपल्या शरीराच्या बाहेर तसे काहीच घडत नसते. सर्व घटना, व्यक्तींना बाह्य जगात स्थानच नसते म्हणूनच त्या भ्रामक असतात. थोडक्यात स्वप्न जगत हे मिथ्या असते.

डोळे झाकलेले असताना अनेक गोष्टी (हिमालयाच्या रांगा, अमेरिकेतील उंच इमारती) पाहू शकत असलो तरी शरीरात त्या गोष्टींना राहण्यासाठी जागा नसते.

तथ्य म्हणजे जसे आहे तसे, सत्य, वास्तव! म्हणजे खरी सत्ता, अस्तित्व - Existance! याच्या उलट, विरोधी म्हणजे वितथ्य आणि त्याचा भाव म्हणजे वैतथ्य.

संवृत - सर्व बाजूंनी झाकले गेलेले

त्यामुळे बाहेरही काही नाही आणि शरीरातही जागा नाही म्हणून या दोन कारणांनी स्वप्न जगत खरे नाही भ्रामक आहे हे कोणालाही पटेल.

©www.madhaveeraghuveer.com

अदीर्घत्वाच्च कालस्य गत्वा देशान्न पश्यति।
प्रतिबुद्धश्च वै सर्वस्तस्मिन्देशे न विद्यते ॥२॥

स्वप्नामध्ये अगदी थोड्या वेळात माणूस कुठल्या कुठे पोहोचतो. आणि जाग आल्यावर तो आपल्याच घरी असतो. यावरून स्वप्नातील प्रसंग काल्पनिक, खोटे आहेत असे मानायला हवे.

अभावश्च रथादीनां श्रूयते न्यायपूर्वकम्।
वैतथ्यं तेन वै प्राप्तं स्वप्न आहुः प्रकाशितम्॥३॥

याज्ञवल्क्य-जनक संवाद - बृहदारण्यक ४.१०

स्वप्नामध्ये रथातून हिंडतो आहे असे दिसले तरी प्रत्यक्षात तिथे रथ नसतो, घोडे नसतात, मार्ग नसतो. माणूस स्वतःच ते निर्माण करतो व आत्मज्योतिने ते सर्व बघतो.

या सर्वांचा अभाव असतो हे श्रुतींनी सांगितलेले वचन उचित आहे, तर्कसंगत आहे. तेव्हा श्रुतींनी व युक्तिवादाने स्वप्न हे मिथ्या आहे हे स्पष्ट झाले.

जागृतीतील अनुभवांना देखील हे कसे लागू पडते ते पुढे सांगणार आहेत.

अन्तःस्थानात्तु भेदानां तस्माज्जागरिते स्मृतम्।
यथा तत्र तथा स्वप्ने संवृतत्वेन भिद्यते॥४॥

जसे स्वप्नात तसेच जागृतीत आहे असे समजावे. फरक केवळ स्थानात आहे. आपण स्वप्न आत पाहतो. तिथे अगदी थोडीच जागा असते. ती वेढलेली (संवृत) असते.

स्वप्नात पाहत असलेली स्थाने, व्यक्ती, प्रसंग सर्व काही कल्पित असतात. ते आपण आपल्या मनाच्या लहानशा परिघात

Birthday / Anniversary

© www.madhaveeraghuveer.com

पाहत असतो. परंतु त्या त्या वेळी ते ते सर्व खरेच वाटत असते. इतकेच नाही तर त्या अनुभवाचा शरीरावर परिणाम सुध्दा दिसून येतो. (घाम येणे, पायात गोळे येणे तोंडात चव लागणे)

आता, जागृतीत घडणाऱ्या गोष्टी तर बाहेर घडत असतात. व त्यांच्यासाठी क्षेत्रही विशाल असते. परंतु ही स्थाने, व्यक्ती, प्रसंग सुध्दा स्वप्नाप्रमाणे भ्रामक असतात.

स्वप्न पाहताना ते कितीहि खरे वाटले तरी जागे झाल्यावर त्यातील वैतथ्य लक्षात येते. भ्रम होता हे समजते.

त्याचप्रमाणे हा संसाराचा-जगाचा खेळ अज्ञान आहे तोवर्यंत खराच वाटतो. पण जेव्हा एका ब्रह्माशिवाय काहिहि खरे नाही हे समजेल, त्यावेळी आज जागेपणी दिसते आहे ते खरे नाही हे लक्षात येईल.

तेव्हा स्वप्नातील जग व जागृतीतील जग, हे दोन्ही काल्पनिकच आहे. तो भ्रमच आहे.

बाह्य जग हे गोचर आहे ते दिसते, स्वप्नही दिसते परंतु स्वप्नाप्रमाणेच बाह्य जगही भ्रामक आहे. किंबहुना जे इंद्रियांनी जाणले जाते, जे गोचर आहे ते सर्व मिथ्या आहे. मायेच्या प्रांतातले आहे.

स्वप्नजागरितस्थाने ह्येकमाहुर्मनीषिण:।
भेदानां हि समत्वेन प्रसिद्धेनैव हेतुना॥ ५॥

स्वप्नामध्ये अनुभवत असलेले जग आत असते. तर जागृतीमध्ये जग बाहेर असते. इथे केवळ स्थानामध्ये भेद आहे. परंतु दोन्हीकडे दृश्य (ग्राह्य) द्रष्टा (ग्राहक) यात समानता आहे

दोन्हीतील साम्यावरून सारखेपणा लक्षात येतो.

आहारनिद्राभयमैथुनं च सामान्यमेतत् पशुभिर्नराणाम्।

Birthday / Anniversary

©www.madhaveeraghuveer.com

यावरुन समानता ध्यानात येते कारण चित्शक्ती दोन्हीमध्ये आहे. स्वप्नात दृश्य व द्रष्टा आहे तसेच जागृतीतही दोन्ही असते. ∴ ज्ञानी लोक स्वप्न व जागृती समानच मानतात.

कारण स्वप्न, जागृतीत त्रिपुटी आहे व त्रिपुटी हा मायेचा खेळ आहे. त्यामुळे स्वप्नात व जागृतीत मायाच भुलवते, खेळवते

आदावन्ते च यन्नास्ति वर्तमानेऽपि तत्तथा।
वितथैः सदृशाः सन्तोऽवितथा इव लक्षिताः॥ ६॥

ज्याला आरंभ नाही व अंतही नाही त्याला खरे तर वर्तमानातही अस्तित्व नाही. ते पूर्वीही नव्हते व नंतरही नसणार. अशा गोष्टी मिथ्याच आहेत.

अव्यक्तादीनि भूतानि व्यक्तमध्यानि भारत।

प्रागभाव (आधी अभाव) व ध्वंसभाव (नंतरही अभाव) आहे आणि केवळ मध्य मात्र अल्पकाळ व्यक्तरूपात असेल तर त्याविषयी चिंता, शोक कशाला?

जे आधी होते, आताही आहे, ते पुढेसुद्धा असणार आहे - तेच केवळ सत्य आहे. मात्र जग व जगातील वस्तू मिथ्या आहेत.

रज्जुसर्प - आधी सर्प नव्हता व ज्ञान झाल्यावर देखील सर्प नाही. केवळ मध्यंतरीच्या काही काळापुरता सर्प दिसतो, खरे तर भासतो. तसेच अज्ञानाच्या काळापुरते जग दिसते ज्ञान झाल्यावर जग नाहीच हे कळते.

"जेवि उदेला चंडांशु। मावळवीत विश्वाभासु॥

सप्रयोजनता तेषां स्वप्ने विप्रतिपद्यते।
तस्मादाद्यन्तवत्त्वेन मिथ्यैव खलु ते स्मृताः॥ ७॥

मागील मंत्रातील युक्तिवाद न पटल्यामुळे कोणीतरी आक्षेप घेतो व स्वप्नातील भ्रामकता मान्य करतो परंतु जागृतीच्या

Birthday / Anniversary

8 am अनुभव खरा मानतो. कारण त्यापासून तृप्ती मिळते.
या आक्षेपाला यात उत्तर दिले आहे. वास्तवातील जग
9 खरे आहे असे जरी तुला वाटत असले तरी तो खरेपणा
स्वप्नात अमान्य केला जातो. प्रत्यक्षात भिकारी असलेला
10 स्वप्नात सिंहासनावर बसू शकतो. तेव्हा स्वप्नात का होईना
तो त्याचे दारिद्र्य अमान्य करतो. नाकारतो. आणि एक
11 निराळेच काल्पनिक जग निर्माण करतो.
जनक राजाने स्वप्नामध्ये स्वतःला दारिद्र्यात अन्नासाठी
12 वणवण हिंडत असलेले पाहिले.
थोडक्यात, जागेपणी आपण स्वप्नातील जग नाकारतो
1 pm तसेच स्वप्नामध्ये वस्तुस्थिती नाकारतो. या दोन्हीला आदि-
अंत नाही. त्या त्या काळात ते ते खरेच वाटत असते.
2 खरे अन्न जशी खरी भूक भागवते त्याच क्षमतेने
स्वप्नातील अन्न स्वप्नातील भूक भागवते.
3 सारांश, गोचर (इंद्रियांनी अनुभवाला येणाऱ्या) गोष्टी
भ्रामकच असतात. मग ती जागृतावस्था असो की स्वप्नावस्था!
4 त्रिकाल सत्य असते तेच सत्य असते.
यद् दृष्टं तन्नष्टम्। दिसे ते नासे।

5

अपूर्वो स्थानिधर्मो हि यथा स्वर्गनिवासिनाम्।
6 तानयं प्रेक्षते गत्वा यथैवेह सुशिक्षितः ॥८॥

7 आक्षेपकाच्या शंका अजूनही आहेत. त्यांच्या म्हणण्याप्रमाणे
स्वप्नातील अनुभव अतर्क्य असतात. काहीही घडू शकते.
परंतु जागृतीतील अनुभव तर तर्काला धरून असतात.
मग जागृती व स्वप्न यांची तुलना करून त्यांना समान करून
काय म्हणता येऊ शकेल? हे योग्य नाही.
याला गौडपादाचार्य उत्तर देतात.
खरे आहे. स्वर्गात जे आहे ते पृथ्वीवर नाही. इंद्राला



© www.madhavaraghuveer.com

२८ ऑक्टोबर २०१८

8 am हजार डोळे आहेत. विष्णूला चार हात, ब्रह्मदेवाला चार मस्तके आहेत, शंकराला त्रिनेत्र आहेत. असे काही पृथ्वीवर दिसत नाही.

9 प्रत्येक स्थानाचे आपापले धर्म असतात. स्वर्गातले नियम इथे लागून चालत नाही. त्यांच्या नियमाप्रमाणे त्यांचा
10 लोक असतो. तसेच स्वप्नस्थानाचे नियम वेगळे आणि जागृतावस्थेचे नियम वेगळे असतात. त्या त्या अवस्थेत
11 ते ते धर्म तर्कसंगत, योग्यच वाटतात.

आत्मा स्वप्नात गेल्यावर एखाद्या माहितगार माणसाप्रमाणे
12 सहज वागतो. दुसऱ्या गावाला जाऊन सुद्धा तो भांबावून जात नाही. सुशिक्षित (जाणकार) असल्यासारखा त्याला सर्व
1 pm गोष्टी माहिती असतात. तेथील जो तो तिथल्या नियमांप्रमाणे व्यवस्थित अनुभवतो. प्रत्येक स्थानाचे नियम निराळे असतात

2 दक्षिण भारतात प्रत्येक सवाष्ण बाई फूल घालते तर उत्तर भारतात गरत्या स्त्रिया केसात फुले माळत नाहीत. केवळ वेश्या
3 फुले माळतात. त्यामुळे तिथे फुले देणे हा अपमान समजला जातो परदेशात गाड्या चालवण्याचे नियम वेगळेच आहेत.

4 तसेच जागृतीतल्या जगाचे नियम वेगळे, स्वप्नातील जगाचे नियम वेगळे आहेत. आत्मा त्या त्या अवस्थेत त्या त्या
5 जगाशी एकरूप होतो व त्या जगात जाणकाराप्रमाणे वावरतो.

∴ जागृतीतील अनुभव जागृतीतील तर्काला धरून असतात
6 तर स्वप्नावस्थेतील " स्वप्नातील " " "

स्वप्नातील गोष्टीत, घटनात कार्यकारण भाव नसतो
7 तसेच जागृत जगातही अनेकदा " " ".

स्वप्नातील गोष्टी अपूर्व असतात. डिस्नेलँडमध्ये सुद्धा अनेक अपूर्व गोष्टी आहेत.

पण म्हणून अपूर्वता हे काही सत्यत्वाचे गमक असू शकत नाही.

Birthday / Anniversary

© www.madhaveeraghuveer.com

स्वप्नवृत्तावपि त्वन्तश्चेतसा कल्पितं त्वसत् ।
बहिश्चेतोगृहीतं सद्दृष्टं वैतथ्यमेतयोः ॥ ९॥

जाग्रद्वृत्तावपि त्वन्तश्चेतसा कल्पितं त्वसत् ।
बहिश्चेतोगृहीतं सद्युक्तं वैतथ्यमेतयोः ॥ १०॥

स्वप्नस्थितीमध्ये स्वप्न पाहणाऱ्याने ते त्याच्या मनाने कल्पिलेले असते पण त्याला तो असत (मिथ्या) समजतो. व जागृतावस्थेत जग पाहणाऱ्याने सुद्धा ते त्याच्या मनाने कल्पिलेले असते त्याला मात्र सत्य समजतो. पण खरे पाहता दोन्ही कल्पितच असतात. एक अंतर्मुखी मनाने तर दुसरे बहिर्मुखी मनाने कल्पिलेले असते, इतकाच फरक!

किंवा जागृतावस्थेत सुद्धा अंतर्मुख मनाने कल्पिलेले (मनोरथ) खोटे वाटते तर बहिर्मुख मनाने कल्पिलेले खरे वाटते. पण नीट विचार केला तर दोन्हीही मिथ्याच आहेत.

थोडक्यात, आपण हे ठरवून टाकतो की स्वप्नातील खोटे व जागेपणातील खरे! पण ही आपली गैरसमजूत आहे. निरपेक्ष सत्यतत्त्वाच्या दृष्टीने दोन्ही जगे कल्पितच आहेत.

गौडपादाचार्यांच्या मतानुसार - स्वप्नावस्थेत जशी तुमची सत्य व असत्य जगे मिथ्या असतात तर जागृतावस्थेत सुद्धा विषयवस्तूंचे सत्य (भासणारे) जगत व विचारांचे असत्य जगत हे दोन्ही देखील मिथ्याच आहेत.

सदानंद- जागृतावस्थेत सुद्धा आपण काही गोष्टी चांगल्या तर काही वाईट ठरवतो. हे सर्व ज्याच्या त्याच्या आवडीनुसार ठरते. आपले जग आपल्या समजुतींवर कल्पनांवर आधारित आहे ∴ ते मिथ्या आहे.

© www.madhaveeraghuveer.com

Birthday / Anniversary

३० ऑक्टोबर २०१८

उभयोरपि वैतथ्यं भेदानां स्थानयोर्यदि ।
क एतान्बुध्यते भेदान्को वै तेषां विकल्पकः ॥११॥

यावर आक्षेप असा आहे की, जागृति व स्वप्नावस्था या दोन्ही स्थानांच्या भेदांमध्ये - नानात्वामध्ये, विविधते-मध्ये जो भ्रामकपणा आहे तो कुणाला कळतो? त्या भ्रमाची कल्पना करणारा कोण आहे?

आम्हाला स्वप्नसृष्टी मिथ्या - भ्रामक आहे हे पटते परंतु जागृतीमधील सर्व गोष्टी सत्य वाटतात. आणि दोन्ही सृष्टी मिथ्या आहेत असे तुम्ही म्हणता! तर असे मिथ्यत्व पाहणारा कुणी आहे का? आमच्या पहाण्यात तरी असा कुणी नाही, या मिथ्या जगाची कल्पना करणारा खरोखर कुणी आहे का?

हे बघणारा कुणीतरी असेल तर तो द्रष्टा व दृश्य असे द्वैत असणारच ना! — वरदानंद

सत्यतत्त्वाचा द्रष्टा कुणी आहे का? जर असा अनुभव व सत्याचा आश्रयस्थान असलेला कुणी नसेल तर तुम्हाला निरात्मवाद, बौद्धांचा शून्यवाद मान्य आहे का? - शंकराचार्य

तुम्ही आत्म्याला मानता, तेव्हा तुम्हाला शून्यवाद मान्य नाही. स्वप्न मिथ्या आहे हे जागे झालेल्याला कळते, पण जागृतीतील जग मिथ्या आहे याची कल्पना कोणी केली! कल्पनेलाही आधार लागतो, तो आधार कुठला?

कल्पयत्यात्मनाऽऽत्मानमात्मा देवः स्वमायया ।
स एव बुध्यते भेदानिति वेदान्तनिश्चयः ।

स्वयंप्रकाशी आत्मा आपल्या मायेने स्वतः स्वतःमध्ये सर्व भेदांची - नानात्वाची कल्पना करतो तो स्वतःच त्या भेदांना जाणतो. असा वेदांताचा नियम आहे.



© www.madhaveeraghuveer.com

8 am वेदांतामध्ये शुध्द ज्ञानाचे प्रतिपादन आहे. त्यात
मूळ विचार - तत्त्वज्ञान आहे.

9 आत्मा हा स्वयंप्रकाशी, स्वतंत्र आहे. त्याचे अस्तित्व
कुणावरही अवलंबून नाही. तो दिक् कालातीत आहे.
10 सौम्य, सदैव अग्रे आसीत | हे श्रुतिवचन आहे.
तो सत् - चित् - आनंद स्वरूप आहे. तो एकमेवाद्वितीय
11 आहे. त्यानेच आपल्या प्रतिभेने या विविध सृष्टीची,
नानात्वाची कल्पना केली. निर्मिती केली.

12 एखादी व्यक्ती जशी बुध्दिबळाचा / पत्त्याचा डाव
दोन्ही बाजूंनी खेळते. मन रमवते परंतु त्याचे मिथ्यत्व
1 pm त्याला ठाउक असते. नाटकामध्ये विविध भूमिका करणारा
नट त्याच्याशी समरस झाल्याप्रमाणे वाटला तरी तो स्वतःला
2 ओळखून असतो आणि भूमिका ही काही काळापुरती आहे,
भ्रामक आहे हे त्याला पक्के माहिती असते. तसेच हा
3 स्वयंभू आत्मा सर्व जाणतो.

त्याचे सत - चित - आनंद स्वरुप आमच्यातही संक्रमित
झालेले आहे. त्याचेच प्रतिरूप आम्ही आहोत. म्हणून आम्ही
ऐक्याचा व भेदाच्या दोन्हीचा अनुभव घेऊ शकतो.
5 त्यातील ऐक्य हे सत्य आहे व भेद हा काल्पनिक आहे.

स्वप्न बघताना जागृतीतला मी विसरला जातो. राजा
6 मंत्री, न्यायाधीश, भिकारी, शिक्षक, सैनिक आहे याचे विस्मरण
होते. तिथे स्वप्नातला 'मी' स्वतःची निराळीच सृष्टी निर्माण करतो.
7 त्या स्थितीत ती स्वप्नसृष्टी खरीच वाटत असते. पण जेव्हा
जाग येते तेव्हा जागृतीतील 'मी' चे स्मरण होते. तेव्हा
आपणच सत्याला बाजूला सारून नवीनच जग उभे केले
होते हे समजते.

त्याप्रमाणेच आपल्यातील खरा मी स्वतःच्या खऱ्या
रूपाला विसरतो व जागेपणी हे जगाचे स्वप्न बघतो.
मायेचा कल्पित पसारा म्हणजे जग! ही माया आहे तोवर

जग आहे. त्यातून जाग आली (आत्मज्ञान झाले) की स्वप्नसृष्टी प्रमाणेच ही जागेपणची सृष्टी सुद्धा मिथ्या आहे हे लक्षात येते. मात्र त्यासाठी मायेचा पडदा उठायला हवा.

त्याप्रमाणे स्वप्नसृष्टी मनःकल्पित तसेच जागृतीतील जग सुद्धा मनःकल्पित असते. आणि दोन्हींचे भ्रामकत्व आत्माच जाणतो. त्या जाणीव तत्त्वाचेच हे सारे खेळ आहेत.

या जगाचे उपादान कारण व निमित्त कारण (कोळ्याप्रमाणे) आत्माच आहे. माया ही त्या आत्म्याची अनिर्वचनीय शक्ती आहे. सत् पण आहे असत् पण आहे. विलक्षण आहे.

आत्मना – बाह्य साधने न वापरता आत्म्यानेच निर्माण केले.
आत्मानम् – मायेच्या सहाय्याने स्वतःलाच बहुरूपात कल्पितो.

दुधाचे दही होणे हा परिणामवाद आहे. परंतु इथे तसेही नाही. आत्मा एकच आहे. त्यात विकार नाही. तो जसा आहे तसाच आहे.

मग मलाच माझ्याबद्दल भ्रम का उत्पन्न होतो? त्याचे उत्तर असे की सूर्यामुळे निर्माण झालेले ढग सूर्याला झाकतात. पाण्यातील शेवाळे पाण्याला झाकते.

माणसाला वेड लागते ते का? त्याच्याच मनोविकारांमुळे! आपणही जगात आपल्या समजुतीनुसार बरे-वाईट ठरवतो त्यामुळे 'मी'ला भ्रम होतो व जागेपणी स्वप्न पडते. थोडक्यात स्वप्नाप्रमाणे जागेपणीचे अनुभव देखील भ्रामक आहेत.

विकरोत्यपरान्भावानन्तश्चित्ते व्यवस्थितान् ।
नियतांश्च बहिश्चित्त एवं कल्पयते प्रभुः ॥१३॥

सर्वांचा स्वामी असणारा तो आपल्या अंतर्मनात असणाऱ्या भावांना तो विकारित (वेगवेगळे) करतो. त्यांच्यात विकार उत्पन्न करतो व बहिश्चित्त होऊन ठरल्याप्रमाणे त्यांची कल्पना करतो.

Birthday / Anniversary

© www.madhaveeraghuveer.com

परमात्म्याला प्रथम स्वतःचे भान येते. मग त्याच्या अंतर्मनात बहु होण्याबद्दल काही अस्पष्ट धूसर कल्पना निर्माण होतात. बहिर्मनात त्या त्या अस्पष्ट रेषा स्पष्ट होतात. मग काम कसे करायचे हे ठरवले जाते. मग तो विविधाचे स्वप्न कल्पितो त्याने हे जग निर्माण केले नाही तर जग स्वप्न पाहिले. आत्मा सर्वव्यापी आहे. अहंकेंद्रित जीव जेव्हा मन बुद्धीच्या उपाधीत येतो, तो मनाच्या भिंगातून बाहेर पाहतो तेव्हा त्याला नानात्व, द्वैत दिसते.

थोडक्यात जीव जेव्हा वासनांच्या चष्म्यातून जगाकडे बघतो तेव्हा त्याला विविधतेने भरलेले जग दिसते. मन-बुद्धीतून जाणिवतत्त्वाला मागे खेचले तर विविधता दिसणार नाही. मूळ जाणीव शुद्ध आहे, पण मन बुद्धीच्या माध्यमातून बाहेर पाहिल्यावर त्याचे रंग घेऊन बाहेर पडते. ही बहिर्मुखता हेच विविधतेचे कारण आहे. जाणिवतत्त्व शुद्धच राहिल तर विविधता नाही.

चित्तकाला हि येऽन्तस्तु द्वयकालाश्च ये बहिः।
कल्पिता एव ते सर्वे विशेषो नान्यहेतुकः॥ १४॥

स्वप्नात पाहिलेली गोष्ट स्वप्न संपेपर्यंतच अस्तित्वात असते. कल्पना ही कल्पनाकाळापर्यंतच अस्तित्वात असते. परंतु वास्तवात मात्र तसे नसते. मी अनुभव घेत असताना तर ती गोष्ट असतेच पण मी नसतानाही ते असतेच. ते दोन काळाच्या मध्ये असते.

मी घरात, शाळेत, ऑफिसमध्ये असते तेव्हा ते अस्तित्वात असते परंतु मी जेव्हा तिथे नसते तेव्हाही ते असतेच. ते लोप पावत नाही. त्यामुळे मला असे वाटते की स्वप्नातील अनुभव मिथ्या असले तरी जागृतीतील अनुभव खरे असतात.

यावर उत्तर असे की काल ही कल्पनासुद्धा काल्पनिकच आहे. तेव्हा या दोन्ही अवस्थांतील वस्तू निराळ्या समजण्याचे कारण नाही. स्वप्न हे दीर्घकाळाचे पडू शकते. किंवा एकच स्वप्न वारंवार पडू शकते. अशा वेळी अल्पकाळचे खोटे व दीर्घकाळचे स्वप्न खरे असा भेद करता येईल का?

शिवाय काल सापेक्ष आहे, हे विज्ञानही आज मानते. तेव्हा जागृतीतील व स्वप्नातील भ्रम वेगळे मानण्याचे कारण नाही. (न अन्य हेतुकः)

अव्यक्ता एव येऽन्तस्तु स्फुटा एव च ये बहिः।
कल्पिता एव ते सर्वे विशेषस्त्विन्द्रियान्तरे ॥१५॥

स्वप्नात दिसणाऱ्या घटना, व्यक्ती, पदार्थ हे स्थूलरूपात नसतात. अव्यक्तरूपात असतात. स्वप्नातील पसारा कितीही मोठा असला तरी तो आतच असतो.

जागृतावस्थेतील जग मात्र बाहेर असते, स्पष्ट असते व्यक्त असते. ज्ञानेंद्रियांच्या आधारे आपण त्याचा अनुभव घेऊ शकतो. खातरजमा करू शकतो.

या दोन्ही जगातील भेद जर इतका स्पष्ट आहे तर मग ती दोन्ही जगे एकाच प्रकारची आहेत असे कसे म्हणता? ती दोन्ही कल्पित आहेत असे तुम्हाला कसे वाटते?

यावर आचार्यांचे उत्तर असे — त्यांचे ग्रहण आम्ही भिन्न इंद्रियांनी करतो. स्वप्नातील जगाचा अनुभव आपण मनाने किंवा मनात एकत्र झालेल्या इंद्रियशक्तींनी घेतो. मात्र जागृतावस्थेत बाह्य जगाचा अनुभव आम्ही स्थूल ज्ञानेंद्रियांमार्फत घेतो. हा दोन्ही अनुभवात फरक आहे. बाकी दोन्ही जगे ही काल्पनिकच असतात.

यावर वरदानंद म्हणतात - वेगवेगळी इंद्रिये जर एकच पदार्थ जाणण्यासाठी वापरली म्हणून पदार्थ अनेक

© www.madhaveeradhuveer.com

8 am होत नाही. पानात वाढलेला गरम गरम वरणभात
आम्ही डोळ्यांनी पहातो, नाकाने वास घेतो, त्वचेने
9 स्पर्श करतो, रसनेने स्वाद घेतो पण म्हणून ते वेगवेगळे
नसतात. पाणी, बर्फ दोन दिसतात, स्पर्शाला दोन दिसतात
10 पण एका पाण्याचीच ती दोन रूपे आहेत.
स्वप्न अव्यक्त म्हणून खोटे आणि जागृतीतील (फक्त?)
11 व्यक्त म्हणून खरे हा युक्तिवाद टिकणारा नाही.

12 जीवं कल्पयते पूर्वं ततो भावान्पृथग्विधान् ।
बाह्यानाध्यात्मिकांश्चैव यथाविद्यस्तथास्मृतिः ॥१६

1 pm
प्रथम जीवभावाची कल्पना केली जाते. त्यानंतर
2 आध्यात्मिक (आतले) आणि बहिर्गत (दृश्यनिष्ठ) व्यक्तिभाव
कल्पिले जातात. जीवाला जसे ज्ञान होते तशीच त्याची
3 स्मृति राहते.
आता आक्षेपकाच्या आक्षेपांची तीव्रता कमी होऊ
4 लागली आहे. त्याला आचार्यांचा दृष्टीकोन समजावून द्यायचा
आहे. त्यामुळे तो विचारतो - जर आतील अव्यक्त व बाहेरील
5 व्यक्त ही दोन्ही काल्पनिक रूपे मानली तर हे कल्पना-
प्रकरण नेमके केव्हा व कुठे सुरु झाले? कारण कल्पना
6 करणारे मन तर जड आहे, ते पंचमहाभूतांचे बनलेले आहे.
तेव्हा ते आपणहून काही कल्पना करु शकणार नाही. मग
7 हे कल्पनांचे जाळे कुठून सुरु झाले?
त्याला उत्तर असे — ऐतरेय उपनिषद -
परमेश्वराने अनेक शरीरे निर्माण केली त्यातील
सर्वोत्कृष्ट शरीर माणसाचे होते. परंतु ते अचेतन होते,
हालचाल करीत नव्हते. तेव्हा तो स्वतःच ब्रह्मरंध्रातून आत
शिरला तेव्हा शरीर जिवंत झाले, चैतन्ययुक्त झाले.
Birthday / Anniversary शरीरात आल्यावर त्या चितशक्तीला त्या उपाधीच्या

© www.madhaveeraghuveer.com

| M | T | W | T | F | S | S |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 |
| 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 | 14 |
| 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 | 21 |
| 22 | 23 | 24 | 25 | 26 | 27 | 28 |
| 29 | 30 | | | | | |

३१ ऑक्टोबर २०१८

8 am मोह झाला. त्यातून शरीर म्हणजेच मी हा जीवभाव निर्माण झाला. या जीवाला आत्म्यापासून वेगळे असल्याची जाणीव झाली. तेव्हा मन, बुद्धी आले. पंचमहाभूतांच्या सत्वांशापासून त्याची निर्मिती झाली. त्यातून 'अहं'ची जाणीव झाली. पुढे
10 माझे मन, माझी बुद्धी, माझे शरीर असे ममत्व वाढत गेले.

अथवा दुसरा विचारप्रवाह असे मानतो की मानसिक
11 जलाशयात पडलेले प्रतिबिंब म्हणजे जीव. हाच भोक्ता व कर्ता असतो. हा आभासाची बहुगुणित मालिका निर्माण
12 करतो. व्यक्तीच्या पूर्वसंस्कारानुरूप नामरूपाच्या अखंड देखाव्याचे स्वरूप निश्चित केलेले असते. यालाच आचार्य
1 pm 'जसे ज्ञान तशी स्मृति' असे म्हणतात.

ज्या गोष्टीचे आपल्याला ज्ञान नसते, त्याची इच्छा
2 होत नाही. कधीच आंबा खाल्ला नसेल तर त्याचे आकर्षण वाटणार नाही. आपल्या इच्छा या पूर्वी घेतलेल्या अनुभवांवर
3 आधारित असतात. म्हणजेच पूर्वज्ञानाच्या स्मृतिवर इच्छा अवलंबून असतात. जीव ही कल्पना प्रस्थापित झाल्यानंतर
4 पूर्वसंस्कार, भोवतालची परिस्थिती यावर आपले अनुभव ठरतात.

अविद्या, माया, संकल्प यामुळे शुद्ध ब्रह्माच्या ठिकाणी
5 जीवत्व आले. परिणामस्वरूप आपोआपच ज्ञातृत्व, कर्तृत्व आले. कर्तृत्वातून अनेक कर्मे निर्माण झाली. त्या कृतींचे अनुकूल
6 प्रतिकूल परिणाम - त्यातून सुखदुःख दिसू लागली. म्हणजेच कर्तृत्वापाठोपाठ भोक्तृत्व आले. जाणणे - करणे - भोगणे (ज्ञा. क. भो)
7 यामुळे जीवावर नानाप्रकारचे संस्कार घडू लागले. त्यामुळे त्याचे ज्ञान-स्मृति-वासना-कर्म यामध्ये असंख्य भेद निर्माण झाले. किंवा दुसऱ्या शब्दात - जीवाच्या उपभोगाकरता सृष्टी विस्तारली. यापासून व्याप वाढत जातात. त्याचे संस्कार बुद्धीवर होतात. त्यातून ज्ञान, स्मृती व वासना यांचा जन्म होतो आणि अंतःकरणाचे हे सर्व भाव सर्व कर्तृत्व-भोक्तृत्वाला कारण ठरतात
आधी विशिष्टरूपाने जीवकल्पना करतो मग क्रिया मग भाव निर्माण होतात.

Birthday / Anniversary

© www.madhaveeraghuveer.com

27 WED OCT 2010 Priority

Wk 43, 300-065

October 2010

| M | T | W | T | F | S | S |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | 1 | 2 | 3 |
| 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 |
| 11 | 12 | 13 | 14 | 15 | 16 | 17 |
| 18 | 19 | 20 | 21 | 22 | 23 | 24 |
| 25 | 26 | 27 | 28 | 29 | 30 | 31 |

अनिश्चिता यथा रज्जुरन्धकारे विकल्पिता।
सर्प-धारादिभिर्भावैस्तद्वदात्मा विकल्पितः ॥१७॥

त्याप्रमाणे अंधारात दोरीचे खरे ज्ञान न झाल्यामुळे सर्प किंवा पाण्याची धारा असल्याचा तर्क केला जातो त्याच-प्रमाणे आत्म्याबद्दलही विपरीत कल्पना केली जाते.

म्हणजे आत्मा आहे तसाच असतो पण आम्हाला तो जीव आहे असा भ्रम होतो. हा भ्रमच पुढील सर्व भ्रमांचे मूळ कारण बनतो. मूळ वस्तूचे सत्य ज्ञान न झाल्याने विपरीत तर्क केले जातात.

शुध्द जाणीव तत्व असलेल्या आत्म्याला आम्ही भ्रमाने जीव, देह, मन, बुध्दी समजतो. हे सर्व मूळ वस्तूवर केलेले अध्यारोप आहेत.

पृथ्वी स्वतःभोवती फिरते हे तरी आपल्या अनुभवाला कोठे येते? त्यासाठी शास्त्रज्ञांवरच विश्वास ठेवावा लागतो. त्याचप्रमाणे आत्मतत्व हे शुध्द स्वरूप आहे यावर आमचा विश्वास बसत नाही (कारण अनुभव नाही) तरी वेदांवर विश्वास ठेवून ते सत्य मानावे.

निश्चितायां यथा रज्ज्वां विकल्पो विनिवर्तते।
रज्जुरेवेति चाद्वैतं तद्वदात्मविनिश्चयः ॥१८॥

एकदा का दोरीचे खरे स्वरूप लक्षात आले की सर्व भ्रम दूर होतात त्यापूर्वी कोणाला साप, कुणाला पाण्याची धार, कुणाला हार, कुणाला जमिनीतील भेग वाटली होती. हे सर्व विकल्प एका ज्ञानाने दूर झाले. ही दोरीच आहे अशी खात्री होते. तसेच आत्म्याचे खरे स्वरूप कळले की मग जीव, देह, मन, बुध्दी म्हणजे 'मी' असे वाटणार नाही नित्य, दिव्य, चैतन्यतत्व म्हणजे मी आहे.
शिवोऽहं शिवोऽहम्।

Birthday / Anniversary

© www.madhaveeraghuveer.com

8 am प्राणादिभिरनन्तैश्च भावैरेतैर्विकल्पितः।
मायैषा तस्य देवस्य यया सम्मोहितः स्वयम्॥१९॥

9 त्या दीप्तिमान, तेजस्वी आत्म्याची मायाच स्वतःला
10 संमोहित करते त्यामुळे आपण आपल्यातील आत्मतत्वाला
प्राण, जीव इ० नी समजतो, कल्पना करतो. माया आपले खरे
11 स्वरूप झाकते व विपरीत स्वरूप दाखवते. आवरण व विक्षेप
हे मायेचे दोन गुण आहेत.

12 ही माया त्याचीच शक्ती आहे. मूळ रूप विसरल्याखेरीज
भास होणार नाहीत. हे काम माया करते. तिने मूळ रूप झाकल्याने
1 pm कल्पनांना वाव मिळतो. त्यामुळे आपण नानात्वाने भरलेल्या
जगाची, त्रिगुणांची, पंचमहाभूतांची कल्पना करतो. मात्र ज्या क्षणी
2 सत्यस्वरूपाचे भान येते तेव्हा आपोआपच कल्पना गळून पडतात.

3 प्राण इति प्राणविदो भूतानीति तद्विदः।
गुणा इति गुणविदस्तत्त्वानीति च तद्विदः॥२०॥

4 ३७ प्रकारे वर्णन

प्राण जाणणारे आत्म्याला प्राण म्हणतात. भूतमात्रांना जाणणारे
5 आत्म्याला भूत समजतात. गुण जाणणारे त्याला गुण म्हणतात.
तर पंचतत्व जाणणारे त्याला तत्व समजतात.
6 हे बहुविधतेचे जग निर्माण कसे झाले?
वैशेषिक हे प्राणालाच सत्यस्वरूप मानतात. म्हणजे सूत्रात्मा
7 हिरण्यगर्भ, समष्टिमन हा अर्थ आहे. श्वास हा अर्थ नाही.
चार्वाक - जडवाद्यांच्या या संप्रदायाला लोकायत म्हणतात.
त्यांच्या मते (आकाश सोडून) चार महाभूतांच्या संयोगाने चेतना बनते
सांख्य - तीन मनोवैज्ञानिक (सत्व, रज, तम) गुणांच्या क्रीडेमधून
जग निर्माण झाले. निर्मितीपूर्वी हे गुण (क्रोनिक्सी व साम्यावस्थेत होते
शैव - आत्मा, अविद्या व शिव यापासून सत्यस्वरूप बनले आहे

Birthday / Anniversary

Priority

१ नोव्हेंबर २०१८

October 2010

| M | T | W | T | F | S | S |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | 1 | 2 | 3 |
| 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 |
| 11 | 12 | 13 | 14 | 15 | 16 | 17 |
| 18 | 19 | 20 | 21 | 22 | 23 | 24 |
| 25 | 26 | 27 | 28 | 29 | 30 | 31 |

8 am पादा इति पादविदो विषया इति तद्विदः।
लोका इति लोकविदो देवा इति तद्विदः ॥२१॥

9 ज्यांना आत्म्याचे पाद माहिती आहेत ते म्हणतात की,
10 हे पाद - विश्व, तैजस, प्राज्ञ - एकत्र येऊन सत्यस्वरूप बनते.
वात्स्यायन आणि समान विचारांचे विषयांना - शब्द,
11 स्पर्श, रूप, रस, गंध - सत्यस्वरूप मानतात.
पौराणिकांच्या मते विविध लोक एकत्र मिळून (लोक - तीन,
12 सात, चौदा) सत्यस्वरूप बनले आहे.
मीमांसक अग्नि, इंद्र इ० देवांना सत्यस्वरूप मानतात.

1 pm वेदा इति वेदविदो यज्ञा इति तद्विदः।
2 भोक्तेति च भोक्तृविदो भोज्यमिति च तद्विदः ॥२२॥

3 वैदिन नावाचा पंथ वेदांच्या आधारावरच जगाची उत्पत्ति
मानतो. ब्रह्मदेवाला वेदांमध्येच उत्पत्तिचे मार्गदर्शन मिळाले.
4 बोधायन इ० कर्मकांडाला महत्त्व देणारे यज्ञ हे सृष्टिउत्पत्तिचे
मूळ मानतात. (पुरुषसूक्तातील मंत्र या विधानाला पुष्टि देतात.)
5 सांख्य तत्त्वज्ञानी पुरुष हा कर्ता-करविता नसून केवळ
भोक्ता आहे असे मानतात. तर सूपकार (सूपशास्त्रकार) भोज्य
6 हेच परमार्थवस्तु मानतात. उपभोक्ता हा भोज्याच्या अभावी
राहू शकत नाही. (स्वयंपाकी, आचारी) भोज्य हे मुख्य
ते भोगण्यासाठी भोक्ता निर्माण
7 झाला

सूक्ष्म इति सूक्ष्मविदः स्थूल इति स्थूलविदः।
मूर्त इति मूर्तविदोऽमूर्त इति तद्विदः ॥२३॥
काल इति कालविदो दिश इति च तद्विदः।
वादा इति वादविदो भुवनानि इति तद्विदः ॥२४॥
मन इति मनोविदो बुद्धिरिति च तद्विदः।
चित्तमिति चित्तविदो धर्माधर्मौ च तद्विदः ॥२५॥

Birthday / Anniversary

© www.madhaveeraghuveer.com

जग हे परमश्रेष्ठ सत्यस्वरूपाचा विकार (परिणाम) आहे.

सत्यस्वरूप सूक्ष्म असून ते हृदयातील सूक्ष्म दहराकाशात राहते.

चार्वाक मानतात की स्थूल देह हाच आत्मा आहे. ते जडवादी आहेत. लोकायत किंवा देहात्मवादी म्हणून ओळखले जातात. काही जण विषयेंद्रियांना सर्वस्व मानतात. त्यांना इंद्रिय-आत्मवादी तर मनाला सत्यस्वरूप मानणाऱ्यांना मन-आत्मवादी म्हणतात. सगुणोपासक चतुर्भुज, चक्रधारी विष्णु वा शिव यांना सत्स्वरूप मानतात. त्यांना आगमी म्हणतात तर बुद्धधर्मीय शून्याव्यतिरिक्त काही मानत नाहीत. ते शून्यवादी!

ज्योतिषशास्त्र व खगोलशास्त्र जाणणारे 'काल' या घटकाला शाश्वत समजतात व त्यापासून हे जग निर्माण झाले असे मानतात. परंतु वास्तविक काळ हा शाश्वत नसून बदलणारा आहे.

दिग्वेत्ते दिशेला (अवकाशाला) सर्वांचे मूळ मानतात.

किमयागार किंवा रसायनशास्त्रज्ञ मूळ तत्त्वाला वाद मानतात. धातुवाद, मंत्रवाद इ.

१४ भुवनांना शाश्वत समजणारे ते भुवनकोशवादी आहेत.

जडवादी मनाला तर बुद्धिवादी बुद्धीला सर्वश्रेष्ठ मानतात. वास्तविक झोपेत मन ही नाही व बुद्धीही नसते.

चित्ताला शाश्वत मानणारा एक बुद्धधर्मीय संप्रदाय किंवा योगाचारी आहेत. इंद्रियजन्य ज्ञान व विवेक हा चित्तमुख्य होतो.

मीमांसक धर्म-अधर्म, पाप-पुण्य हे सत्यस्वरूप मानतात.

पञ्चविंशक इत्येके षड्विंश इति चापरे।
एकत्रिंशक इत्याहुरनन्त इति चापरे ॥२६॥

Birthday / Anniversary

© www.madhaveeraghuveer.com

Priority: Day by day in every way
I am getting better & better

October 2010

| M | T | W | T | F | S | S |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | 1 | 2 | 3 |
| 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 |
| 11 | 12 | 13 | 14 | 15 | 16 | 17 |
| 18 | 19 | 20 | 21 | 22 | 23 | 24 |
| 25 | 26 | 27 | 28 | 29 | 30 | 31 |

8 am

9

10

11

12

लोकाँल्लोकविदः प्राहुराश्रमा इति तद्विदः।
1 pm स्त्रीपुंनपुंसकं लैङ्गाः परापरमथापरे ॥२७॥

2 लोकांना खूष करणारे लौकिक रंजनालाच तत्व असे मानतात. दक्षप्रभृति आश्रम हाच परमार्थ आहे असे समजतात. तर वैय्याकरणी पुल्लिंग, स्त्रीलिंग, नपुंसकलिंग हेच सत्यस्वरूप आहे असे मानतात.

3 ब्रह्माला पर व अपर मानणारे वेदांती ब्रह्मतत्वाला दुहेरी समजतात. यालाच निरपेक्ष व सापेक्ष किंवा उच्चतर व निम्नतर असेही म्हटले जाते.

5

6 सृष्टिरिति सृष्टिविदो लय इति तद्विदः।
स्थितिरिति स्थितिविदः सर्वे चेह तु सर्वदा॥२८॥

7 निर्मितिवादी आत्म्याला सृष्टी म्हणून ओळखतात. जे लय मानतात ते आत्म्यालाच लय मानतात. तर स्थितिवादी त्याला स्थिति म्हणतात. उत्पत्ति स्थिति लय ही सर्व त्याचीच रूपे आहेत.

त्वमेव केवलं कर्तासि त्वमेव केवलं धर्तासि
त्वमेव केवलं हर्तासि।

Birthday / Anniversary

©www.mauliaveeraghuveer.com

8 am यं भावं दर्शयेद्यस्य तं भावं स तु पश्यति।
तं चावति स भूत्वासौ तद्ग्रहः समुपैति तम्॥२९॥

9

त्याला जो भाव दाखवला जातो तो तो भाव बघतो
10 आणि मग तोच होऊन जातो. तोच त्याचे रक्षण करतो.
तो माणूस तो भावच होऊन जातो.
11 गुरु ज्या संप्रदायाचा असेल त्यातील सिद्धांत तो
शिष्याला सांगतो. शिष्य त्याने दिलेल्या दृष्टिकोणातून
12 श्रद्धेने व निष्ठेने बघतो. ती श्रद्धा, निष्ठा त्याचे रक्षण
करते. मग तो त्या विचारांशी एकरूप होऊन जातो.
1 pm ही श्रद्धा त्याच्या मनात वज्रलेपासारखी पक्की होते.
त्याचा त्यांना लाभच होतो. यातून समज-गैरसमजही होतात.
2 मात्र खरा सत्यान्वेषक सत्यापर्यंत पोहोचू शकतो.
मनाचा लय झाला तर इतर अनावश्यक गोष्टी गळून पडतील
3 आणि शुद्ध सत्यापर्यंत साधक पोहोचू शकेल.

Homogeneous

4 एतैरेषोऽपृथग्भावैः पृथगेवेति लक्षितः।
एवं यो वेद तत्त्वेन अविशङ्कितः कल्पयेत् सो॥३०॥

5

कल्पयेत्सोऽविशङ्कितः। अमरतत्त्व हे या सर्वांपासून वेगळे
6 नसले तरी वेगळे व भिन्न भासते. हे जो यथार्थपणे
जाणतो तोच केवळ त्या तत्त्वाला निःशंकपणे जाणतो-चिन्मय
7 स्वतःपासून वेगळ्या नसलेल्या प्राणादि भावांनीच
आत्मा हा वेगवेगळा भासतो. हे तत्त्व ज्याला समजते
तो जेव्हा कल्पना करतो तो निःशंक असतो - वरदानंद
आत्म्याहून पृथक् नसलेल्या प्राणादि भावांनी हा आत्मा
(रज्जु जशी सर्पाच्या विकल्पाने) पृथक् आहे असा कल्पिलेला आहे.
मूढांनी तर तो पृथक् असल्याचा निश्चय केला आहे. असे जो
तत्त्वतः जाणतो तो निःशंकपणे वेदार्थाची कल्पना करतो - जोग



© www.madhaveeraghuveer.com

8 am ① इमानि भूतानि इदं सर्वं यत् अयम् आत्मा। बृह. २.४.६
② एकच आत्मा नानारूपानी नटलेला आहे. - उपनिषद
9 ③ त्या एका ब्रह्मतत्वाचे वेगवेगळे आविष्कार म्हणजे विविध देवता)

10

स्वप्नमाये यथा दृष्टे गन्धर्वनगरं यथा।
11 तथा विश्वमिदं दृष्टं वेदान्तेषु विचक्षणैः ॥३१॥

12 त्याप्रमाणे मायेचे स्वप्न पहावे किंवा आकाशात गंधर्वनगर दिसावे त्याप्रमाणे वेदांतात निपुण असलेल्या
1 pm विद्वानांकडून हे जग पाहिले जाते. हे जग ही स्वप्नाप्रमाणे मनःकल्पित आहे.
2 मानसिक भ्रांति असताना सत्यस्वरूप स्पष्ट दिसत नाही. आपल्या विचारांच्या चष्म्यातून पहात असताना आपण
3 पहात असलेले सर्व खरेच वाटते. त्याचे सत्यस्वरूप ध्यानात येत नाही. जोवर शरीर, मन, बुद्धि आहे तोवर
4 भ्रम आहे. त्यापलीकडे गेले तर 'नेह नानास्ति किंचन' हे सत्य विचक्षणांप्रमाणे उलगडेल.

5

न निरोधो न चोत्पत्तिर्न बद्धो न साधकः।
6 न मुमुक्षुर्न वै मुक्तः इत्येषा परमार्थता ॥३२॥

7 इथे प्रलयही नाही वा उत्पत्तिही नाही. त्यामुळे कोणी बद्ध नाही मुक्त ही नाही. सिद्ध-साधक मुमुक्षु कोणीनाही हीच अंतिम सत्यस्थिती आहे. अहं निर्विकल्पो निराकार रूपो ----

'मी' ही भावना उदय पावली व विश्व निर्माण झाले सोबत तो 'मी' कळतो तेव्हा विश्वही कळते

इथे एकच तत्व आहे. त्याला मी चे भान नाही आणि तेच परमार्थतः अंतिम सत्य आहे. सत्‌च्या अधिष्ठानावर हा सर्व खेळ चालू आहे.

Birthday / Anniversary

© www.madhaveeraghuveer.com

३ नोव्हेंबर २०१८

भावैरसद्भिरेवायमद्वयेन च कल्पितः।
भावा अप्यद्वयेनैव तस्मादद्वयता शिवा॥३३॥

हा आत्मा असत् म्हणजे मिथ्या वस्तू म्हणून आणि अद्वय म्हणूनही कल्पिला जातो म्हणून अद्वयता मंगल आहे.

कल्पना ही अशिव आहे. तर अद्वयता अभय, मंगल, शिव कल्याणस्वरूप आहे. — शंकराचार्य.

असत् अशा प्राणादि भावांनी आत्मतत्त्वावर अनेकत्वाची कल्पना होते. या कल्पित भावांच्या मुळाशीही अद्वयच असते आणि ते अद्वयच शिव आहे — वरदानंद

नात्मभावेन नानेदं न स्वेनापि कथञ्चन।
न पृथङ्नापृथक्किञ्चिदिति तत्त्वविदो विदुः॥३४॥

हे भिन्न भिन्न रूपाचे अनेकत्व आत्म्याशी एकरूप होऊन राहत नाही. तसेच ते स्वतःच्या जीवावर स्वतंत्रपणे राहू शकत नाही. हे अनेकत्व ब्रह्मापासून पृथक् ही नाही अपृथक् ही नाही. वेगळेही नाही, एकही नाही असे तत्त्वज्ञ म्हणतात.

सूर्याची किरणे सूर्यापासून वेगळी दिसत असली तरी त्यांना स्वतंत्र अस्तित्व नाही. ती परावलंबी आहेत. ती सूर्यापासून वेगळी आहेत आणि नाहीतही.

जग हा ब्रह्मावर होणारा भास आहे. ब्रह्म हे जगाशिवाय स्वतंत्र असू शकते परंतु जग हे ब्रह्माशिवाय असू शकत नाही. परंतु अज्ञानामुळे जग वेगळे व ब्रह्म वेगळे वाटते.

आरंभी जर ब्रह्माशिवाय काहीच नव्हते तर त्यातून निर्माण झालेले जग त्याच्याशिवाय भिन्न कसे असेल? तत्त्वज्ञानी तर ते निर्माण झालेच नाही, तो केवळ भास आहे असे मानतात. अगा जे घडलेचि नाही, त्याची वार्ता पुससी काय परंतु आपल्या मनोवैज्ञानिक व्यक्तिमत्त्वावर खोलवर कोरले गेलेले संस्कार मूळ धरून असतात. ∴ अद्वैत जाणवत नाही.

Birthday / Anniversary

8 am वीतरागभयक्रोधैर्मुनिभिर्वेदपारगैः।
निर्विकल्पो ह्ययं दृष्टः प्रपञ्चोपशमोऽद्वयः ॥३५॥

9 ज्यांची आसक्ती, भय, क्रोध गेलेला आहे अशा वेदपारंगत
10 श्रेष्ठ मुनींकडून हा आत्मा निर्विकल्प, प्रपंचोपशम, अद्वय असा
पाहिला जातो. (अनुभवला जातो)

11 मनावर पूर्ण ताबा असलेले, विरागी ज्ञानवंत असे श्रेष्ठ
मुनी याचा अनुभव घेतात.

12 ज्यांच्या ठिकाणी पूर्ण अभेद आहे, या सर्व पसाऱ्याला
आवरुन घेणे जिथे आहे, जगाच्या विस्ताराचा जिथे उपशम
1 pm होतो असे जे अद्वय तत्त्व तेच एकमेवाद्वितीय ब्रह्म आहे.

2 तस्मादेवं विदित्वैनमद्वैते योजयेत् स्मृतिम्।
अद्वैतं समनुप्राप्य जडवल्लोकमाचरेत् ॥३६॥

3 म्हणून आत्मा अशा स्वरूपाचा आहे हे जाणून घ्यावे.
4 व मग त्या स्मृतीशी एकरूप व्हावे. परमात्म्याशी एकरूप व्हावे.
अद्वैत तत्त्वाला प्राप्त केल्यानंतर लोकामध्ये जडवत रहावे.
5 जणू काही आपण अचेतन वस्तू आहोत याप्रमाणे वागावे.
अलौकिक नोहेवे लोकाप्रती।

6 परब्रह्माचा अनुभव घ्यावा. त्यातच सदा मग्न रहावे. परंतु
जगासमोर त्याचे प्रदर्शन करु नये. स्वतः नित्य दक्ष रहावे.
7 कारण आनंदाच्या भरात तोल जाण्याची शक्यता असते.

© www.madhaveeraghuveer.com

Birthday / Anniversary

निस्तुतिर्निर्नमस्कारो निःस्वधाकार एव च।
चलाचलनिकेतश्च यतिर्यादृच्छिको भवेत्॥३७॥

कुणाकडूनही स्तुती वा नमस्काराची इच्छा अपेक्षा (एषणा) आत्मज्ञानी व्यक्तीने ठेवू नये. सहज होऊन रहावे. चल शरीरातील अचल तत्त्वाचा आधार घेत ईश्वरेच्छेने जे मिळेल त्यात तृप्त होऊन रहावे. (निकेत - आसरा, घर)

स्तुती - नमस्कार ही लोकेषणा आहे. ती जबरदस्त असते त्यावर ताबा हवा. स्वधाकार म्हणजे पितरांना अर्पण करणे इथे धार्मिक कर्मकांड हा व्यापक अर्थ घेतला तर त्या यतीला कर्मकांडाचे बंधन राहत नाही. तो तत्त्वज्ञान आचरणात आणतो,

तत्त्वमाध्यात्मिकं दृष्ट्वा तत्त्वं दृष्ट्वा तु बाह्यतः।
तत्त्वीभूतस्तदारामस्तत्त्वादप्रच्युतो भवेत्॥३८॥

आत्मतत्त्वाची अंतर्बाह्य अनुभूती घ्यावी. म्हणजे आत्मतत्त्वाचा अनुभव स्वतःमध्ये आणि बाह्य जगातील प्रत्येक गोष्टीत घ्यावा.

जे जे भेटे भूत ते ते मानिजे भगवंत।

त्या परमतत्त्वाशी एकरूप होऊन त्यात मिसळून गेले तर परम सुख परमशांतीचा अनुभव येतो. अशी स्थिती प्राप्त झाल्यावर त्यापासून कधीही ढळू नये. निरंतर त्या आनंदात गढून जावे.

Birthday / Anniversary

© www.mahaveeraghuveer.com

# 22 WED DEC 2010

Wk 51, 356-009

*Priority*

December 2010

| M | T | W | T | F | S | S |
|---|---|---|---|---|---|---|
| | | 1 | 2 | 3 | 4 | 5 |
| 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 | 12 |
| 13 | 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 |
| 20 | 21 | 22 | 23 | 24 | 25 | 26 |
| 27 | 28 | 29 | 30 | 31 | | |

8 am

9

10

11 श्रुतिस्मृतिपुराणानामालयं करुणालयम् ।

12 नमामि भगवत्पादं शंकरं लोकशंकरम् ॥

1 pm

2

ब्रह्म सत्यं जगन्मिथ्या जीवो ब्रह्मैव नापरः ।

3

4

5

6

7

Birthday / Anniversary

© www.madhaveeraghuveer.com

30 THU DEC 2010

Wk 52, 364-001

*Priority* [illegible] २०२०

श्री.

मुंडक उपनिषद (प्रणवोपासना)

| December 2010 | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| M | T | W | T | F | S | S |
| | | 1 | 2 | 3 | 4 | 5 |
| 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 | 12 |
| 13 | 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 |
| 20 | 21 | 22 | 23 | 24 | 25 | 26 |
| 27 | 28 | 29 | 30 | 31 | | |

8 am [illegible]

[illegible]

9 [illegible]

[illegible]

10 [illegible]

[illegible] नाही.

11 [illegible]

[illegible]

12 [illegible]

[illegible]

1 pm [illegible] — अप्रमाद — [illegible]

2

3

4

5

6

7

Birthday / Anniversary

© www.madhaveeraghuveer.com

| Name of Business | E-mail | Website |
| --- | --- | --- |

अवघी वने हा बगीचा पलंग ज्याचा मेदिनी
अष्टसिध्दी दासीपरी राबतात ज्याचे घरी
तो न तुमची पर्वा करी त्याचे वैभव निराळे ||

उत्तमा सहजावस्था मध्यमा ध्यानधारणा ।
अधमा तीर्थयात्राधमाधमा ||

© www.madhaveeraghuveer.com

uary ११.५.२०१३

| CREDIT | | | | DEBIT | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| PARTICULARS | Rs. | P. | | DATE | PARTICULARS | Rs. | P. |

॥ ॐ ॥

उपनिषद - गुरु - शिष्य संवाद. नुसते जवळ बसणे नाही.
शिष्यांच्या अंतरंगाचे परिवर्तन होते.
आजच्या शाळा म्हणजे ज्ञानाची दुकाने आहेत. विद्यार्थी-चोर
सुमारे ६०,००० वर्षांपूर्वी लिहिली गेली.
चांगल्या विचारांना कधीच बिनबाधा होत नाही. अमृताचा
ज्ञान हे शब्दात साठवता येते. म्हणून त्याला अक्षर म्हणतात
ज्याने जगाला विचार दिला त्याने जगाला आकार दिला
ज्ञान शिळे होत नाही. ज्ञानाला बुरशी येत नाही.
मध्वाचार्य, रामानुजाचार्य, शंकराचार्य - संस्कृत टीका
पं. सातवळेकर, टिळक, सदाशिवशास्त्री भिडे
डॉ. राधाकृष्णन, अष्टादशी - विनोबा भावे
डॉ. देशमुख असे अनेक विद्वान आहेत.
उपनिषदे म्हणजे श्रुती. वेदांत म्हणजे वेदवृक्षाची फळे
शब्दांना महत्त्व आहे.
He should be hanged till death.
उपनिषदे वेगवेगळ्या काळात लिहिलेली आहेत. ते ऋषी
अनुभूतीच्या समान पातळीवर नव्हते. त्यामुळे वचनात फरक
पडतो. त्यामुळे सामान्य जनांचा गोंधळ उडतो.
पूर्वी समाजमध्ये पंच अवयवी पद्धती होती.

| | |
|---|---|
| पर्वतावर अग्नी आहे | वेद शब्दांनी युक्त |
| धूर दिसतो म्हणून | शब्द हे चुकीला पात्र |
| जिथे धूर तिथे अग्नी | मनुष्य चुकीला पात्र |
| स्वयंपाकघरात पाहिले आहे | म्हणून वेद हे चूक आहेत |
| तसेच येथे आहे. | |

पौरुषेय - मनुष्यकृत - दोषयुक्त
अपौरुषेय - ईश्वरकृत - निर्दोष
आकार आला की मर्यादा आली, सर्वगामित्व नाही, व्यापकता नाही
ऋषी मंत्रद्रष्टे होते. त्यांना मंत्र दिसले.

© www.madhaveeraguveer.com

February

| CREDIT | | | | DEBIT | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| DATE | PARTICULARS | Rs. | P. | DATE | PARTICULARS | Rs. | P. |

न्यूटनचा शोध द्रष्टा, दृश्य, दर्शन या पलीकडचा आहे.
न्यूटन हा संशोधक नाही तो द्रष्टा आहे. एडिसनने
वीजेचा शोध लावला नाही. सृष्टीमध्ये वीज आधीपासूनच
होती. गुरुत्वाकर्षण पूर्वीही होतेच. ज्या गोष्टी मुळातच आहेत
त्याचे दर्शन आपण घेतो. विचारवंतांनी घेतलेली दर्शने
षड् दर्शने आहेत

© www.madhaveeraghuveer.com